‘स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद’ - कर्मवीर

ACCREDITED WITH GRADE B+ NAAC

रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्राबाई-शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी

# कर्मरजत

२०२२-२०२३



लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना
स्मृतिशताब्दी वर्षपूर्ती निमित्ताने विनम्र अभिवादन



रयत शिक्षण संस्था दक्षिण विभाग चेअरमन मा. डॉ. शेख साहेब यांचा सत्कार करताना मा. सरोज (माई) पाटील व इतर मान्यवर



मा.श्री.अजित पाटील साहेब (सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल रयत शिक्षण संस्था, सातारा) यांचा सत्कार करताना मा. प्र. प्राचार्य प्रो. डॉ. डी. आर. भोसले, डॉ. आय. एच. मुल्ला



मा. डॉ. शेख साहेबांचा सत्कार करताना प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. डी. आर. भोसले साहेब इतर मान्यवर



महाविद्यालय संलग्न समिती अध्यक्ष मा.प्राचार्य डॉ.व्ही.एम.पाटील व मा. डॉ. आर. जी. कोरबू यांचे स्वागत करताना प्राचार्य व मान्यवर



महाविद्यालय विकाससाठी निधी संदर्भात मा. आमदार प्रकाश अण्णा आवाडे यांना निवेदन देताना



'बेटी बचाव, बेटी पढाव' अभियाना अंतर्गत कु. पल्लवी शेवाळे हिला रु. ३०००/– बँक खाते ठेव पावती सुपुर्द करताना

निजदेहाचे झिजवून चंदन । तुम्ही वेचिला इथे कण कण
आणि फुलविले हसरे नंदन । स्मृतीस तुमच्या शतशः वंदन



## पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील
(डी.लिट.)

## रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी

अध्यक्ष



मान. खासदार पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार

चेअरमन



मान. डॉ. अनिल पाटील

व्हाईस चेअरमन



मा. ॲड. भगीरथ शिंदे

सचिव



प्रि. डॉ. व्ही. एस. शिवणकर

सहसचिव व ऑडिटर



प्रि. डॉ. एस. जी. मेनकुदळे

सहसचिव (माध्यमिक)



मा. श्री. एस. बी. नागपुरे

ओ.एस.डी.



मा.प्रिं. शहाजी डोंगरे

## आमच्या महाविद्यालयाचे थोर देणगीदार दांपत्य



मान. सौ. रजनीताई शेंडुरे व मान. अशोक शेंडुरे (अमेरिका)




प्र. प्राचार्य प्रो. डॉ. डी. आर. भोसले

## महाविद्यालय विकास समिती

चेअरमन



श्रीमती सरोज (माई) पाटील

सदस्य



मा. कल्लाप्पाण्णा आवाडे

सदस्य



मा. पद्मश्री शिवराम भोजे

सदस्य



मा. मानसिंगराव देसाई

सदस्य



मा. शिवराज नाईक

सदस्य



श्री. ए. एन. पाटील

सदस्य



प्रा. डॉ. एम. एस. मुजावर

सदस्य



श्री. के. आय. मुलाणी

सदस्य



प्रा. श्रीमती
जे. एल. बनसोडे

सदस्य



प्रा. डी. सी. तुळशीकट्टी

सदस्य



डॉ. संध्या माने

सदस्य



सौ. शिंदे एम. एस.

सचिव



प्र. प्राचार्य
प्रो. डॉ. डी. आर. भोसले

# सल्लागार समिती



प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील



प्राचार्य आर. बी. माळी



प्राचार्य डॉ.व्ही.एम.पाटील



श्री. एस. सी. बारगे

# महाविद्यालयातील यशस्वी गुणवंत प्राध्यापक



**प्रो. डॉ. एस.व्ही. चंदनशिवे**
मुद्रा साहित्य संस्था जालनाच्या वतीने दिला जाणारा,
राज्य स्तरीय मुद्रासाहित्य पुरस्कार प्राप्त
शिवाजी विद्यापीठ मराठी अभ्यास
मंडळावर सदस्य म्हणून निवड.



**डॉ. जे. एस. इंगळे**
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अर्थशास्त्र
अभ्यास मंडळ - अध्यक्षपदी निवड



**प्रा. एम. एस. मुजावर**
राष्ट्रीय उत्कृष्ट हिंदी अध्यापन सेवा
कार्य पुरस्कार २०२२



**डॉ. आय. एच. मुल्ला**
शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर
विभागीय क्रीडा परिषद सचिव म्हणून निवड



**प्रा. डॉ. संदिप संभाजी माने**
भूगोल विषयातून शिवाजी
विद्यापीठाची पीएच. डी. पदवी प्राप्त



**प्रा. डॉ. विलास पांडूरंग चौगले**
इंग्रजी विषयातून शिवाजी
विद्यापीठाची पीएच. डी. पदवी प्राप्त

# महाविद्यालयातील यशवंत गुणवंत विद्यार्थी

## एम पी एस सी परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी



**कु. मोनाली धनाजी गिरी**
एम. पी. एस. सी. परीक्षेत सहाय्यक
स्थापत्य अभियंता पदी निवड



**श्री. महेश सदाशिव सुतार**
एम. पी. एस. सी. परीक्षेत राज्य कर
निरीक्षक पदी निवड

## केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात व महाराष्ट्र पोलीस दलात उत्तीर्ण झालेले विद्यार्थी



**श्री. निलेश रामचंद्र गोंधळी**
केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात
कॉन्स्टेबल पदी निवड झाली



**आदिनाथ माणिक खोत**
मुंबई पोलीस पदी निवड



**श्री. अमीर मियांलाल मुजावर**
महाराष्ट्र पोलीस दल सिंधुदुर्ग जिल्हा
पोलीस पदी निवड



**श्री. अविनाश बाळासाहेब मायगोंडा**
मुंबई पोलीस पदी निवड



**भाग्यश्री पाटील**
पुणे जिल्हा पोलीस पदी निवड



**भक्ती गोंधळी**
पुणे जिल्हा पोलीस पदी निवड



**निकिता जाधव**
सातारा जिल्हा पोलीस पदी निवड



**प्रियंका लंगोटे**
ठाणे पोलीस पदी निवड



**श्रीराज भोसले**
२०२२–२३ मध्ये U-17 National
Chess tournament मध्ये
Silver Medal (Andhra Pradesh)

# राष्ट्रीय सेवा योजना
# विविध प्रसंग व कार्यक्रम




'आजादी का अमृत महोत्सव' अंतर्गत 'हर घर तिरंगा अभियानाद्वारे' दत्तक गाव तळंदगे येथील नागरिकांना तिरंगा फडकविताना पाळावयाची नियमावलीचे पत्रक वाटप



१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना, मानवी हक्क आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या वतीने आयोजित रांगोळी स्पर्धेचे उद्‌घाटन व पाहणी



२ ऑक्टोंबर महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यान



राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि मानसशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १० ऑक्टोंबर मानसिक आरोग्य दिनानिमित्त मार्गदर्शन करताना मार्गदर्शक मा. डॉ. मनिषा भोजकर (हुपरी)



राष्ट्रीय सेवा योजना आणि अंतर्गत तक्रार निवारण समितीद्वारे रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर यांच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे एच.बी. तपासणी शिबिर




राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कोल्हापूर यांच्यावतीने सामाजिक न्याय विभाग अंतर्गत समता पर्व सन २०२२ तृतीयपंथी कल्याण व हक्कांचे संरक्षण अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान

# राष्ट्रीय सेवा योजना
# विविध प्रसंग व कार्यक्रम





२५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जनजागृती अभियानपर महाविद्यालयात तसेच हुपरी व रेंदाळ परिसरामध्ये मतदार राजा जागा हो हे पथनाट्य सादर करताना एन. एस. एसचे स्वयंसेवक.




दत्तक गाव तळदंगे येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने 'मतदार राजा जागा हो' ही जनजागृतीपर रॅली काढण्यात आली.




दि.७/१/२०२३ रोजी दत्तक गाव तळंदगे येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना मा. डॉ.अलोक जत्राटकर (जनसंपर्क अधिकारी शि. वि., को.)



दि.१३/१/२०२३ रोजी दत्तक गाव तळंदगे येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या समारंभ समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना मा. प्रा.डॉ. विलास सोयम (उपकुलसचिव, शि. वि. को.)



दत्तक गाव तळदंगे येथे विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये आपली कला सादर करताना स्वयंसेवक.

## राष्ट्रीय सेवा योजना
## विविध प्रसंग व कार्यक्रम



दत्तक गाव तळंदगे येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर दरम्यान कुमार व कन्या शाळा परिसरामध्ये वृक्षारोपण करताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. डी. आर. भोसले, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. संध्या माने, प्रा. डॉ.बराले, शिक्षकवृंद व स्वयंसेवक



दत्तक गाव तळदंगे येथे विशेष श्रमसंस्कार शिबिरा दरम्यान गाव परिसरातील गटार स्वच्छता करताना शिबिराचे स्वयंसेवक.



दत्तक गाव तळंदगे येथे जगन्नाथ मंदिर परिसरामधील झाडांना आळी करताना शिबिरातील स्वयंसेवक.



दत्तक गाव तळदंगे येथे कुमार व कन्या मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना वही-पेन्सिलचे वाटप करताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. डी. आर. भोसले, उपप्राचार्य डॉ. चंदनशिवे, कार्यक्रमाधिकारी डॉ. संध्या माने, शिक्षक वृंद व स्वयंसेवक



२९/४/२०२३- बेटी बचाव अभियान अंतर्गत मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. अक्षता गावडे (नाईट कॉलेज, कोल्हापूर)



कर्मवीर भाऊराव पाटील यांची पुण्यतिथी आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी सांगता सप्ताह निमित्त जानकी वृद्धाश्रम घोसरवाड येथे एक क्विंटल तांदूळ, किराणामालाचे साहित्य व जुने कपडे देताना

# विविध व्याख्याने व कार्यक्रम



मराठी विभाग आयोजित अग्रणी कार्यशाळेचे उद्घाटन करताना डॉ. रफिक सुरज व डॉ. गिरीश मोरे आणि मान्यवर



मराठी विभाग आयोजित अग्रणी कार्यशाळा–सूत्रसंचालन : एक कला या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. रफिक सुरज



मराठी विभाग आयोजित अग्रणी कार्यशाळेचे उद्घाटन करताना डॉ. रफिक सुरज व डॉ. गिरीश मोरे आणि मान्यवर




हिंदी विभागाचे भित्तीपत्रिका उदघाटन प्रसंगी मान्यवर.



हिंदी दिन निमित्त प्रमुख पाहुणे मा. प्रा. डॉ. एकनाथ पाटील व इतर मान्यवर.



प्र प्राचार्य डॉ. डी.आर. भोसले अध्यक्षीय समारोप करताना.

# विविध व्याख्याने व कार्यक्रम



हिंदी दिन समारंभ मध्ये उपस्थित विद्यार्थी.



आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत हिंदी विभागाच्या वतीने विशेष व्याख्यान देताना प्रा. एल. डी. नाईक.




भूगोल विभाग मार्फत "World Ozone day" निमित्ताने भित्तीपत्रके प्रदर्शन उदघाटन करताना मा.प्राचार्य व इतर मान्यवर




भूगोल दिनानिमित पृथ्वी गोलाचे पूजन करताना मा. प्राचार्य व इतर शिक्षक व विद्यार्थी वर्ग



अग्रणी महविद्यालये अंतर्गत भूगोल विभाग मार्फत एक दिवशीय कार्यशाळेत (दि १० मार्च २०२३ रोजी) विद्यार्थीना 'पर्यटनातील आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ.ए,एन. पाटील, DKSC, कॉलेज इचलकरंजी.



'भारतातील महिलांवरील हिंसाचार' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. आनंद गाडीवड्ड

# विविध प्रसंग व कार्यक्रम




अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 'ई बँकिंग' या
विषयावरील भीत्तीपत्रिकेचे उद्घाटन करताना
प्रो. डॉ. एस एम भोसले व प्रो. डॉ. डी. बी. शेडगे



शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत
अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित कार्यशाळेत
मार्गदर्शन करताना प्रो. डॉ. भोसले




'वाणिज्य मंथन' (२०२२-२३)
Smt. Banasode J.L Head, Dept of
Commerce Felicitated to Hon. Prin. Dr. D. R. Bhosale
D.R.Keynote Address(Date; 25/08/2022)




'वाणिज्य मंथन' (२०२२-२३)
Hon. Prin. Dr. D. R. Bhosale D.R
presented Keynote Address (Date; 25/08/2022)




Resource person Shri. Anil Bhandare
introduce the operative functions
of Tally E.R.P.-9 Date: 1/12/2022



Inauguration of Trade Fair
Date: 03/03/2023

# विविध प्रसंग व कार्यक्रम



Chief Guest Shri Rahul Ingrole ,
Shri. Manasingrao Desai (Anna),
Prin. Dr.Prof. Bhosale D.R visited to Trade
Fair Date: 03/03/2023




Chief Guest Shri Rahul Ingrole ,
Shri. Manasingrao Desai (Anna),
Prin. Dr.Prof. Bhosale D.R visited to Trade Fair
Date: 03/03/2023




Hon. Shri.Dhananjay Kulkarni (Student
Development Officer, Nilaya Foundation, Pune.)
Being guide the participated students in the Guest
Lecture on 'Success Mantra & Intelligent & Skills'
(Date: 10/04/2023)




Hon. Prof. Dr. Padalkar V.V. guiding the
participated students in the Guest Lecture on
'Indian Ancient Trade' (Date: 16/03/2023)



प्रजासत्ताक दिन



प्रजासत्ताक दिन : पथनाट्य सादरीकरण

## जिमखाना डे

# जिमखाना डे क्रीडा स्पर्धा २०२२-२३ चे काही क्षण






## कला दालन





**मेघा रामण्णा**, बी. ए. भाग ३

# सांस्कृतिक विभाग




जिजामाता जयंती व स्वा. विवेकानंद स्मृतिदिन




रयतेचा राजा छ. शिवाजी महाराज जयंती




क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती




डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन




महर्षी वि. रा. शिंदे स्मृतिदिन




वाचन प्रेरणा दिन

# सांस्कृतिक विभाग



पत्रकार दिन



महात्मा जोतीराव फुले जयंती



राजर्षी छ. शाहू महाराज कृतज्ञता पर्व (स्मृतिदिन)



डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन–
व्याख्यान देताना डॉ. एस. व्ही. चंदनशिवे



प्रवेशद्वार उदघाटन : प्रास्ताविक करताना
मान.प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ. डी .आर भोसले. व मान्यवर



प्रवेशद्वार उदघाटन : हस्ते मान. सौ. रजनीताई व अशोक शेंडुरे,
महा. विकास समिती सदस्य व मान्यवर

# विविध व्याख्याने व कार्यक्रम



डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील जयंती सोहळा



कर्मवीर प्रतिमा मिरवणूक



पदमभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील स्मृतिदिन



रयतमाऊली सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील स्मृतिदिन
अन्न वाटप



पारंपरिक दिन



शिवाजी विद्यापीठ युवा मोहत्सव सहभाग : मूकनाट्य



विद्यापीठ युवा मोहत्सव सहभाग : लघुनाटिका

‘स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद !’

– कर्मवीर



# कर्मरजत

संस्थापक :

**पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील**

डी. लिट.


नियतकालिक

अंक तेवीसावा

सन २०२२–२३


---


रयत शिक्षण संस्थेचे,

## चंद्राबाई–शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी

ता. हातकणंगले,

जि. कोल्हापूर –४१६ २०३

फोन : (०२३०) २४५०३५५

ई–मेल : acscollegehpr@yahoo.co.in

वेब : www.csscollegehpr.com


नॅक पुनर्मानांकन ‘बी+’ (CGPA -2.72)


**संपादक मंडळ**

अध्यक्ष

प्रभारी प्राचार्य

प्रो. (डॉ.) डी. आर. भोसले

प्रमुख संपादक

प्रा. डॉ. एस. व्ही. चंदनशिवे

विभागीय संपादक

प्रा. बी. बी. जाधव

प्रा. एम. एस. मुजावर

प्रा. डी. सी. तुळशीकट्टी

प्रा. जे. एल. बनसोडे

डॉ. संदीप माने

# कर्मरजत

**सन २०२२-२३**

**नियतकालिक**

**अंक तेवीसावा**




| **मुखपृष्ठ संकल्पना :** प्रो. (डॉ.) डी. आर. भोसले व श्री. सचिन भोसले |

| **आतील छायाचित्र मांडणी :** प्रा. संदीप माने व संपादक मंडळ |

| या अंकातील साहित्यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. |

**सूचना, प्रतिक्रिया :** E-mail - acscollegehpr@yahoo.co.in |

**| हा अंक खाजगी वितरणासाठी आहे. |**



# भावपूर्ण श्रद्धांजली



शैक्षणिक वर्ष २०२२–२३ मध्ये

शहीद झालेले जवान, देशातील, महाराष्ट्रातील
कर्तृत्ववान व्यक्ती, रयत शिक्षक संस्था व महाविद्यालयाशी
संबंधित हुपरी पंचक्रोशीतील व्यक्ती ज्यांचे निधन झाले
अशा सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली!



दि प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट (नियम)
क्र. ८ फॉर्म नं. ४ प्रमाणे आवश्यक माहिती

| | | |
|---|---|---|
| **प्रकाशन स्थळ** | : | चंद्राबाई–शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी |
| **मुद्रकाचे नाव** | : | श्री. निहाल शिपूरकर, द्वारा, भारती मुद्रणालय, कोल्हापूर |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | भारती मुद्रणालय, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर. फोन : २६५४३२९ |
| **प्रकाशकाचे नाव** | : | प्रभारी प्राचार्य प्रो. (डॉ.) डी. आर. भोसले |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | चंद्राबाई–शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी, जि. कोल्हापूर–४१६ २०३ |
| **संपादकाचे नाव** | : | प्रो. डॉ. एस. व्ही. चंदनशिवे |
| **पत्ता** | : | चंद्राबाई–शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी, जि. कोल्हापूर |
| **मालकी** | : | रयत शिक्षण संस्था, सातारा यांचे चंद्राबाई–शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी, जि. कोल्हापूर |

मी प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. डी. आर. भोसले जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

**प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. डी. आर. भोसले**
प्राध्यापक, एम. ए., सेट, पीएच.डी.



# संपादकीय

**प्रिय विद्यार्थी व शिक्षक,**

महाविद्यालयाचा शैक्षणिक, संख्यात्मक, गुणात्मक, लेखाजोखा 'कॉलेज वार्षिक' वियतकालीकातून दरवर्षी प्रसिद्ध केला जातो. कॉलेजच्या यशस्वीतेचा, प्रगतीचा चढता आलेख वार्षिक अंकातून मांडला जातो. तो 'कर्मरजत' वार्षिक अंक आज आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, त्यांच्यातील लेखन कला, चित्रकला, मुलाखत कौशल्य यांना विकसित करण्यासाठी वार्षिक अंक प्रत्येक महाविद्यालयातून वर्षाच्या शेवटी प्रकाशीत केला जातो. त्यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या लेखन कलेला वाव दिला जातो. याशिवाय, महाविद्यालयातील प्रत्येक कमिटीचे कामकाज, खेळाडू मुलांचे यश, प्राध्यापकांचे यश याचा प्रकर्षाने उल्लेख केला जातो. वार्षिक अंक म्हणजे महाविद्यालयाचा 'आरसा' असतो.

चालू वर्षाचा 'कर्मरजत' अंक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, प्रो. डॉ. डी. आर. भोसले यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनातून शक्य तेवढा सुंदर व वाङ्मयीन गुणांनी परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी, हिंदी, इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांचे वैचारिकलेख, समीक्षणात्मक लेख, मुलाखत, वर्णनपर लेख तसेच रेखाचित्रे, सामाजिक, राजकीय आणि प्रेमविषयावरील कवितांचा सुंदर खजिना सदर अंकात पहावयास मिळेल. सर्व कमिट्यांच्या कामकाजाचा आढावा, प्राध्यापकांच्या वैयक्तिक उपक्रमांची माहिती ही देण्यात आली आहे. महाविद्यालयात होणारे कार्यक्रम, थोरा मोठ्यांची व्याख्याने अशा अनेक उपक्रमांच्या नोंदी व छायाचित्रे दिली असून सदरचा अंक अत्यंत देखण्या स्वरुपात तयार केला असून आपण विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक प्रेमी त्यांचे स्वागत कराल अशी अपेक्षा.

सदर अंकाच्या कामात विभागीय संपादक, अहवाल विभाग संपादक, फोटो विभाग संपादक व संपादक मंडळातील सर्व सदस्य यांनी मोलाचे सहकार्य केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. डी. आर. भोसले, साहेब यांचे मौलीक मार्गदर्शन लाभले.

**प्रो. डॉ. सुनील चंदशिवे**
संपादक, कर्मरजत



# प्राचार्यांचे मनोगत

**प्रिय रसिक व विद्यार्थी बंधू-भगिनीनों,**

रयत शिक्षण संस्थेच्या चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी या शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरशी संलग्न असलेल्या महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक 'कर्मरजत' सन २०२२-२३ आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होतो आहे. कोरोना महामारीनंतर या वर्षी महाविद्यालय नियमित चालू झाले. या वर्षभरामध्ये शैक्षणिक कामकाजाबरोबरच कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा म्हणून विविध उपक्रम राबविण्यात आले. महाविद्यालयीन जीवनामध्ये सृजनशील लेखन विद्यार्थ्यांकडून व्हावे म्हणून विविध दिनविशेष व विभागीय उपक्रमा दरम्यान 'अक्षरबन' भित्तीपत्रिकेचे आयोजन करणेत आले. तसेच या नियतकालिकासाठी विद्यार्थ्यांनी विविध लेखन प्रकारामध्ये लेखन केलेले दिसून येते.

लेखनीने अक्षर लिहिले परि ते न तिचे सामर्थ्य ।
ती लेखनी ज्यांच्या करी, तोच अक्षरे कारी सारी।

असे म्हटले जाते म्हणून लेखन कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक रयत शिक्षण संस्थेच्या या महाविद्यालयाची स्थापना जून १९९१ साली झाली. जून २०१० साली महाविद्यालय या नूतन इमारतीमध्ये स्थलांतरित झाले. महाविद्यालयाच्या विनाअनुदानित हुपरी, रेंदाळ पंचकोशीतील व्यापारी, उद्योजक, सर्व सामान्य नागरिक थोर देणगीदार यांच्या योगदानातून महाविद्यालयाची वाटचाल यशस्वीरित्या सुरू झाली. हुपरी गावचे सुपुत्र मान, अशोक शेडुरे व सौ. रजनीताई शेंडुरे यांच्या देणगीतून ही भव्य इमारत आकाराला आली व गोरगरीब बहुजन समाजातील मुलामुलींच्या शिक्षणाची सोय झाली. महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर शिक्षणाची सुविधा उपलब्ध असून, सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या ८२३ इतकी आहे. महाविद्यालयात कला विभागात मराठी, हिंदी, इंग्लिश, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र व अर्थशास्त्र स्पेशल विषयाचे व व वाणिज्य विभागात बी. कॉम पदवी व एम. कॉम अकौन्टसी पदव्युत्तर विषयाचे शिक्षण दिले जाते..

तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक मार्फत पदवी व पदव्युत्तर शिक्षणाची सोय आहे. याशिवाय महाविद्यालयात इंग्लिश स्पिकिंग कोर्स, व्यक्तिमत्व विकास, फॅशन डिझायनिंग, ट्रॅव्हल अॅण्ड टुरिझम, हिंदी अनुवाद, स्पर्धा परीक्षा केंद्र, इत्यादी कोर्स यशस्वीरित्या सुरु आहेत.

महाविद्यालयाने उच्च गुणवतेची परंपरा कायम राखली असून सुरज गवळी इतिहास, विभागाचा विद्यार्थी बी.ए. पदवी परीक्षेत प्रथम तर बी. कॉम पदवी परीक्षेत कु. श्वेता मेथे, एम. कॉम पदव्युत्तर परीक्षेत कु. पल्लवी कापसे, हिंदी स्पेशल विषयात कु. स्वाती शिंगडे या विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले. काही विद्यार्थ्यांनी जिमखाना विभागाच्या विद्यापीठ राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी केली असून श्रीराज सुर्याजी भोसले, अनिकेत बापट, प्रणय पाटील या विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय विद्यापीठ बुध्दिबळ स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे. श्रीराज सुर्याजी भोसले यांनी राष्ट्रीय स्तरावर गोल्ड मेडल मिळविले आहे. मिनी ऑलम्पिक तायकोंदो स्पर्धेत निखिल माने याने प्रथम क्रमांक पटकावला. कु. करवते समृध्दी शिवाजी हिने पंजाब येथे अखिल भारतीय विद्यापीठ मार्फत ज्युदो स्पर्धेतयश संपादन

करून राष्ट्रीय स्तरावर सहभाग नोंदवला. राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी संतोष कोळी याची शिवाजी विद्यापीठ मार्फत राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरासाठी निवड झाली. तसेच गडहिंग्लज येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ जिल्हा युवा महोत्सवात २२ विद्यार्थी-विद्यार्थीनींनी सहभाग घेऊन विविध कला प्रकारात उल्लेखनीय कामगिरी केली.

महाविद्यालयातील प्राध्यापकांची शिवाजी विद्यापीठाच्या विविध पदावर नियुक्ती तसेच त्याना पुरस्कार प्राप्त झाले आहेत. शैक्षणिक व ग्रंथलेखनबद्दल प्रो. डॉ. डी. आर. भोसले यांना राष्ट्रीय स्तरावर तर प्रो. डॉ. सुनिल चंदनशिवे याना राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच प्रो. डॉ. जयवंत इंगळे याची शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अभ्यास मंडळाच्या चेअरमन पदी निवड झाली आणि प्रो. डॉ. सुनिल चंदनशिवे व प्रा. डॉ. अरुण शिंदे यांची अनुकमे शिवाजी विद्यापीठच्या मराठी व मानसशास्त्र अभ्यास मंडळ सदस्य पदी निवड झाली आहे. तसेच प्रा. विलास चौगुले व प्रा. संदीप माने यांनी पीएच. डी. पदवी संपादन केली आहे प्रा. डॉ. आय. एच. मुल्ला यांची बेंगलोर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी संघ मार्गदर्शक म्हणून निवड झाली. या स्पर्धेत मुलांच्या संघाने जनरल चॅम्पीयनशीप पटकावली तर मुलीच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच चेन्नई येथे झालेल्या भारतीय आंतर विद्यापीठ अॅथलेटिक्स स्पर्धेसाठी संघव्यवस्थापक म्हणून डॉ. मुल्ला यांची निवड झाली. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यादाच संघाने जनरल चॅम्पीयनशीप पटकावली व लखनौ येथे झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ अथलेटिक्स स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. याबद्दल सर्वांचे हार्दिक अभिनंदन !

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व बॉडी बिल्डर क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत नाव कमवलेले मा. श्री. सुभाष पुजारी पी.एस.आय, मुंबई) हे होते यावेळी महाविद्यालयाच्या परिसरातील, विविध गावभागातून माजी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाच्या प्रवेश द्वाराचे कामकाज मा. अशोक शेंडुरे व सौ. रजनीताई शेडुरे यानी दणगी रूपये पाच लाख दिलेल्या रक्कमेतून पूर्ण करण्यात आले याचे उद्‌घाटन या थोर देणगीदारांच्या हस्ते व मा. श्री. माधवराव मोहिते (दादा), चेअरमन, दक्षिण विभाग, रयत शिक्षण संस्था, मा. श्री. मानसिंगराव देसाई (आण्णा) व महाविद्यालय विकास समिती सदस्य यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

**चर्चासत्राचे आयोजन :**

१. यावर्षी महाविद्यालयातील हिंदी विभागमार्फत एक दिवसीय आंतरराष्ट्रीय वेबीनार दि. २३/०५/२०२३ रोजी 'हिंदी साहित्य और संविधानिक मूल्य' या विषयावर आयोजित करण्यात आले. यामध्ये मॉरिशस, दुबई, दिल्ली, उत्तरप्रदेश बिहार इ. देश विदेशातील प्राध्यापक व अभ्यासक सहभागी झाले होते.

२. महाविद्यालयातील मराठी विभागामार्फत दि. १९ मे २०२३ रोजी 'समकालीन मराठी साहित्यातील सविधान मुल्ये या विषयावर एकदिवशीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले.

३. दि २० मे २०२३ रोजी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने 'Economic Policies of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj' या विषयावर राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले.

४. ३ जून २०२३ रोजी महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्यावतीने 'Reconstuction of Maratha His-

tory' या विषयावर राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले.

१. यावर्षी महाविद्यालयास आय.एस.ओ ९००१:२०१५ हे मानांकन, इंद्रप्रस्थ सिस्टि सह प्रा. लि. नवी दिल्ली याचेकडून प्राप्त झाले.

२. महाविद्यालयात नवीन एन.सी.सी युनिट सुरू करण्यात येणार असून यासाठीचा प्रस्ताव एन.सी.सी विभाग कोल्हापूर यांचेकडे पाठविला आहे.

३. महाविद्यालयातील विद्यार्थ्याच्या आवश्यकतेनुसार कॉलेज कंटीग बाधकाम करणे, कॉलेज इमारतीच्या दर्शनी भागाच्या पहिल्या मजल्याचे बांधकाम करणे, बास्केट बॉल प्राऊड तयार करणे, कॉलेज परिसरात पेविंग ब्लॉक बसविणे, लॅण्ड स्केपिंग करून घेणे इ. कामे करणे गरजेचे आहे याची सुरूवात लवकरच होईल. तसेच संगणक कक्षासाठी आणखी नवीन संगणक वाढविण्यात येणार आहेत.

४. थोर देणगीदार मान, अशोक शेइरे व सौ. रजनीताई शेंदरे यांनी या वर्षी महाविद्यालयाच्या सभागृहाच्या नुतनीकरणासाठी रू. २५०००००० (पंचवीस लाख) देणगी स्वरूपात दिले. त्यांच्या इच्छेप्रमाणे थोर देणगीर सभागृहास मा. विजय साठे सभागृह असे नामकरण करण्यात येत आहे.

५. नवीन शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात बी.सी.ए. बी.सी.एस. बी. कॉम आय. टी. एम.बी.ए. इत्यादी नवीन अभ्यासकम कोर्सेस सुरू करण्याचा मानस आहे. महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीत सदर कोर्सेस सुरू करण्यास मान्यता घेणेत आलेली आहे.

६. राष्ट्रीय नेते मान. शरदचंद्रजी पवारसाहेब यांची रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी फेरनिवड झाली तसेच संस्थेच्या चेअरमनपदी मान. चंद्रकांत दळवी साहेब याची निवड झाली, संस्थेच्या दक्षिण विभागाचे चेअरमन पदी मान, डॉ. एम. बी. शेखसाहेब यांची निवड झाली. संस्थेच्या सचिव पदी मान. प्राचार्य डॉ. व्ही. एस. शिवणकर, सहसचिव प्रचार्य डॉ. डी. के मस्के तर ऑडिटर पद मान, प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांची फेरनिवड झाली. तसेच नूतन सर्व पदाधिका-याचे हार्दिक अभिनंदन व पुढील शैक्षणिक, सामाजिक कार्यास मनापासून शुभेच्छा!

महाविद्यालयाच्या विकासासाठी मा. शरदचंद्र पवार साहेब, अध्यक्ष रयत शिक्षण संस्था, मा. श्रीमती सरोज (माई) पाटील, चेअरमन महाविद्यालय विकास समिती, रयत शिक्षण संस्थेचे सचिव मान प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव मा. प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. डॉ. एम.बी. शेख साहेब, महाविद्यालय विकास समिती सदस्य मान, मानसिंगराव देसाई (आण्णा) सर्व महाविद्यालय विकास समिती सदस्य तसेच जनरल बॉडी सदस्य राहुल इंगळे इत्यादीनी बहुमोल सहकार्य लाभले याबद्दल मी मनापासून धन्यवाद देतो, तसेच हुपरी पंचक्रोशातील थोर देणगीदार, हितचिंतक, सेवाभावी संस्था, संघटना यांची वेळोवेळी महाविद्यालयास मदत मिळत राहिली, याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त करतो.

रयत शिक्षण संस्थेच्या या महाविद्यालयाचा विकास उत्तरोत्तर होत राहील असा विश्वास व्यक्त करतो.

धन्यवाद !

**– प्रो. (डॉ) डी. आर. भोसले**

प्र. प्राचार्य

# मराठी विभाग



आता विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञे तोषावें ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ।।
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जिवाचे ।।
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्य पाहो ।
जो जे वांच्छिल तो ते लाहो । प्राणिजात ।।

– संत ज्ञानेश्वर

**विभागीय संपादक**
प्रा. बी. बी. जाधव
मराठी विभाग प्रमुख

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


- **मराठी भाषेचा इतिहास**/
  श्वेता श्रावण कांबळे, एम.कॉम.भाग-दोन
- **वारकरी संतांची ओळख** /
  आकांक्षा अनिल प्रभावळे, बी. कॉम. भाग-तीन
- **माझी मराठी मायभूमी** /
  तनुजा राजेंद्र थोरात, बी.कॉम. भाग - एक
- **क्रांतीकारक भगतसिंग** /
  आरती लक्ष्मण माटके, बी. ए. भाग - तीन
- **पु. ल. देशपांडे : हरहुन्नरी व्यक्तीमत्त्व** /
  काजल वाईंगडे, बी.कॉम. भाग - तीन


## पद्य विभाग


- **नशीब** / सायली राजेंद्र दुर्गे, बी.कॉम. १
- **मी चित्र काढलं** / गणेश रंगराव ठोंबरे, बी.ए. २
- **कॉलेज म्हणजे काय ?** / जयराज कोळी, बी. ए.-१
- **फौजी** / रेवती शिवाजी आदमाने, बी.ए. भाग १
- **ती व्यक्ती** / धनश्री जयवंत मुगडे, बी. ए. -२
- **जगायचं राहून गेलं** /
  कु. दिव्यानी दत्तात्रय भडगावे, बी. ए.-२
- **मी उभी खंबीर आहे** /
  कु. संजश्री नामदेव घुणके, बी. ए. -३
- **आयुष्य** / निकिता किरण कांबळे, बी.ए. - १
- **जीवन असंच जगायचं असतं** /
  निकिता किरण कांबळे , बी.ए. -१

# मराठी भाषेचा इतिहास

**श्वेता श्रावण कांबळे**
एम.कॉम. भाग-२

मराठी भाषा ही इंडो–आर्यन कुटुंबातील मानली जाते. साताऱ्यामध्ये सापडलेले तांब्याचे शिलालेख ७९५सी. ई. चे मानले जातात. असेच काही शिलालेख रायगड जिल्ह्यातील अक्षी तालुक्यात सापडले. जे १०१२ सी.ई.चे मानले जातात. दिवे इथे सापडलेले जमीन व्यवहाराचे तांब्याचे शिलालेख हे १०६० किंवा १०८६ सी.ई.चे आहेत. याचा अर्थ असा की, मराठी ही १२व्या शतकापर्यंत एक अधिकृत लिखित भाषा झाली होती. यादव काळ ११८७ इ.स.नंतर यादव काळात मराठीचा वावर वाढला. यादवराजे अगोदर कन्नड आणि संस्कृत भाषा वापरत असत. १४व्या शतकाच्या शेवटीपर्यंत मराठी वर्णलेखनाची प्रमुख भाषा झाली होती. असे मानले जाते की, यादवांनी मराठीला प्राधान्य दिले. कारण ते मराठी बोलणाऱ्या प्रजेशी स्वतःला जोडण्याचा प्रयत्न करत होते. पुढे मराठी भाषेचा प्रसार महानुभाव आणि वारकरी पंथांमुळे झाला. यांनी आपल्या धर्माचा आणि शिकवणीचा प्रसार करण्यासाठी मराठीचा उपयोग केला. सेऊण राज्याच्या काळात मराठी भाषा न्यायालयातसुद्धा वापरली जाऊ लागली. यादव राजवटीतील शेवटच्या तीन राज्यांच्या काळात ज्योतिष, आयुर्वेद, पुराण, वेदांतवर मराठी साहित्य गद्य आणि काव्यरूपात तयार करण्यात आले. मराठीतील सर्वात जुना ग्रंथ हे 'विवेकसिंधु' मानले जाते, जो मुकुंदराज यांनी लिहिला. मुकुंदराज हे एक नाथयोगी होते. ते त्या काळातील अग्रगण्य कवी होते. मुकुंदराजांनी शंकराचार्यांच्या कथन आणि शिकवणीवरून हिंदू तत्त्वज्ञान आणि योगमार्ग यांच्या मूलभूत सिद्धांतांचे वर्णन केले.




मुकुंदराजांच्याचा परमात्म ग्रंथ मराठी भाषेत वेदांत स्पष्ट करण्याचा पहिला पद्धतशीर प्रयत्न समजला जातो. पुढे १२३८ मध्ये म्हाइंभट्ट यांनी 'लीळाचरित्र' लिहिले, हे महानुभाव पंथातील चक्रधर स्वामी यांचे आत्मवृत्त होते. पुढे म्हाइंभट्ट यांनी चक्रधर स्वामी यांचे गुरू गोविंदप्रभू यांचे आत्मवृत्त 'गोविंदप्रभूचरित्र' लिहिले. महानुभाव संप्रदायाने धर्म आणि संस्कृतीच्या प्रसारासाठी मराठीला वाहन बनवले. महानुभाव साहित्यात साधारणपणे देवतांच्या अवतारांचे वर्णन, संप्रदायाचा इतिहास, भगवद्‌गीतावरील टीका, श्रीकृष्ण भगवानांच्या कथा आणि व्याकरणाचे वर्णन करण्यात आले. मध्ययुगीन आणि डेक्कन सल्तनत कालावधी १३व्या शतकातील महान वारकरी संत ज्ञानेश्वर यांनी भगवद्‌गीतेवर

मराठीत 'ज्ञानेश्वरी' ग्रंथ लिहिला. त्यांचे समकालीन संत नामदेव यांनी मराठीत तसेच हिंदी भाषेत, अभंग लिहिले. मुकुंदराज हे १३व्या शतकातील प्रसिद्ध कवी होते. त्यांनी 'विवेकसिद्धी' आणि 'परममित्र' ग्रंथ लिहिले जे पौराणिक वेदांताशी संबंधित आहेत. १६व्या शतकात संतकवी एकनाथ यांनी एकनाथी भागवत लिहिले. जे भागवत पुराणावरील भाष्य आहे. तसेच संत एकनाथांनी भारुडेसुद्धा लिहिली जी आजच्या काळातही प्रसिद्ध आहेत. संत तुकाराम महाराज यांनी मराठी एक समृद्ध साहित्यिक भाषा बनविली. संत तुकाराम यांनी सुमारे ५००० अभंग लिहिले. सल्तनत काळातही मराठीचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला. या काळात जरी शासक मुस्लीम होते, तरी स्थानिक जमीनदार, महसूल अधिकारी आणि बहुसंख्य लोकसंख्या हिंदूच होती. यामुळे मराठीचा वापर व्यवहारात करण्यात आला. या काळात खूप सारे पर्शियन शब्द मराठीमध्ये प्रचलित झाले. जसे बाग, शहर, कारखाना, बाजार, कागद, हुशार, जमीन, खुर्ची, हजार, जाहिरात आदी हे शब्द आजही मराठीमध्ये वापरले जातात. मराठा साम्राज्य आज मराठी ज्या रूपात जिवंत आहे ते फक्त छत्रपती शिवाजी महाराजांमुळे, त्यांच्या काळात मराठीला खरे महत्त्व प्राप्त झाले. शासकीय कामकाज आणि बोली भाषा म्हणून मराठीचा विस्तार झाला. मराठी भाषेवरील पर्शियन भाषेचा प्रभाव या काळातच कमी झाला. जसा जसा मराठी साम्राज्याचा विस्तार झाला तसा मराठीचाही विस्तार झाला. या काळात मराठी ही मोडी लिपीत लिहिली जात असे. १८व्या शतकात, पेशवा काळात खूप मराठी साहित्य लिहिले गेले. या काळातील प्रसिद्ध काम म्हणजे वामन पंडित यांचे 'यथार्थदीपिका'. रघुनाथ पंडित यांचे 'नलदमयंती स्वयंवर'. या काळात नवीन साहित्यिक प्रकारचा प्रयोग करण्यात आला. संत एकनाथांचे नातू मुक्तेश्वर यांनी 'ओवी' प्रकार निर्माण केला. त्यांनी महाभारत आणि रामायणाचे मराठी भाषांतरही केले. याच काळात 'पोवाडा' आणि 'लावणी' प्रकारचा उगम झाला. अनंत फंदी, राम जोशी आणि होनाजी बाळा यांनी 'पोवाडा' आणि 'लावणी' प्रसिद्ध केले. ब्रिटिश राज कालावधी १९व्या शतकाच्या सुरुवातीला ख्रिश्चन धर्मप्रचारक विल्यम केरी यांनी मराठी भाषांतरही केले. व्याकरणाचे प्रमाणीकरण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी बायबलचे मराठी भाषांतरही केले. साल १८३९ मध्ये कॅप्टन जेम्स थॉमस कँडी यांनी पहिला मराठी इंग्रजी शब्दकोश (डिक्शनरी) संकलित केला. १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी पहिले मराठी वर्तनमानपत्र 'दर्पण' सुरू केले. याच काळात संगीत नाटकही विकसित झाले. मराठी नाटकाच्या प्रसिद्धीमुळे मराठीचा विस्तार झाला. आधुनिक मराठी काव्याचे पिता केशवसुत यांनी आपली पहिली कविता १८८५ मध्ये प्रकाशित केली. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात निबंधकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आपले नियतकालिक सुरू केले. जोतिबा फुले आणि गोपाळ हरी देशमुख यांनी आपले नियतकालिक सुरू केले. जोतिबा फुले आणि गोपाळ हरी देशमुख यांनी 'दिनबंधू' आणि 'प्रभाकर' नियतकालिकांची सुरुवात केली. २० व्या शतकात मराठी भाषेने पुढचा टप्पा गाठला. मराठी साहित्य, नाटक, चित्रपट यांनी मराठी भाषा आणखी विस्तारली. एन. के. केळकर यांचे जीवनचरित्र लेखन, हरी नारायण आपटे, नारायण सीताराम फडके आणि व्ही. एस. खांडेकर यांचे कादंबरी, विनायक दामोदर सावरकर यांचे राष्ट्रवादी साहित्य आणि मामा वरेरकर आणि किर्लोस्कर यांची नाटके यांनी मराठी भाषा समृद्ध केली. भारतीय स्वातंत्र्यानंतर भारताच्या स्वात्त मराठीला घटनादुरुस्ती (आर्टिकल) ३४४ (१) आणि ३५१ नुसार शासकीय राजभाषेचा दर्जा मिळाला. १९६७ मध्ये झालेल्या २१ व्या घटनादुरुस्तीपर्यंत १४ भाषांना अधिकृत दर्जा होता. आताच्या सुधारणेनुसार कोंकणी, मणीपुरी, सिंधी आणि नेपाळी वगैरेंचा अधिकृत भाषांमध्ये समावेश करण्यात आला. त्यानुसार अधिकृत भाषांची संख्या ही २२ झाली. मराठीला अजूनही अभिजात भाषेचा दर्जा मिळाला नाही. यासाठी मागील दोन दशक प्रयत्न केले जाते आहेत.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी भारतीय सांस्कृतिक मंत्रालयाकडे तसा अर्ज भरला आहे. एखाद्या भाषेला अभिजात भाषा ठरवण्यासाठी काही अटी असतात. त्या म्हणजे ती भाषा प्राचीन असावी (१५०० ते २००० वर्ष) जुनी प्राचीन आणि मूळ साहित्य हवे इत्यादी.

१ मे, १९६० मध्ये विदर्भ आणि मराठवाडा प्रदेश महाराष्ट्रात जोडण्यात आले. हे एकत्रीकरण भाषेच्या आधारावर झाले होते. राज्य आणि सांस्कृतिक संरक्षणामुळे ९०च्या दशकात मराठी भाषेची खूप प्रगती झाली. दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि अखिल भारतीय मराठी नाटक संमेलन आयोजित केले जाते. यामुळे मराठी भाषेचे अस्तित्व टिकून आहे.

इ.स.नाच्या दहाव्या शतकापर्यंत मराठी भाषेची चिन्हे शोधता येतात. आधीच्या काळातही तिचे अस्तित्व असावे याचेही काही उल्लेख आढळतात. मात्र 'लीळाचरित्र' अथवा 'ज्ञानदेवी'च्या आधीचे ग्रंथ उपलब्ध नसल्यामुळे आद्य मराठी ग्रंथ कोणता हा प्रश्न वारंवार उपस्थित होतो. मुकुंदराजांचा 'विवेकसिंधु' हा आद्यग्रंथ असे समजले जात असे. परंतु साहित्य संशोधकांच्या मते तो इ. स.११८८च्या बराच अलीकडचा, म्हणजे ज्ञानदेवी नंतरचा (इ.स. १२९०) असावा. त्यामुळे इ. स. १२७८च्या सुमारास रचला गेलेला 'लीळाचरित्र' हाच अभ्यासकांच्या मते आद्यग्रंथ ठरतो.

इतिहासाचार्य राजवाडे यांनी श्रीपतिकृत मराठी ज्योतिषरत्नमाला शक ९६१ सुमारा या लेखात श्रीपतिगृह विरचित ज्योतिषरत्नमाला या संस्कृत ग्रंथाची त्यांनी स्वतः केलेली टीका हा मराठीतील पहिला ग्रंथ असे म्हटले जाते. 'श्रीपतींची मराठी टीका गद्यात असून ती त्यांनी इ.स.१०५० मध्ये लिहिली. हा टीकाग्रंथ मराठीतील प्राचीनांत प्राचीन असा पहिलाच (उपलब्ध) गद्य ग्रंथ आहे, असे आज तरी मानावयास हरकत नसावी.' ग्रंथ लेखनासाठी आज जशी सामग्री उपलब्ध आहे तशी प्राचीन काळी नव्हती. कागदावर लिहिलेले उपलब्ध असे. प्राचीनतम हस्तलिखित म्हणजे विठ्ठल गलंडकृत 'रसकी मोदी' ची इ.स. १५३४ मध्ये लिहिली गेलेली प्रत हे होय. त्र्यं. शं. शेजवलकर यांच्या मते, पंधराव्या शतकापर्यंत कागदाचा प्रसार महाराष्ट्रात नव्हता. ते म्हणतात, ''महाराष्ट्रात बहामनी राजवटीत दौलताबाद, जुन्नर व ठिकाणी कागदाचे कारखाने असावेत. सोळाव्या शतकात पोर्तुगिजांच्या पश्चिम किनाऱ्यावरील आगमनामुळे त्यांच्या कागदाचा कोकणातून महाराष्ट्रात प्रवेश झाला. महाराष्ट्रात लेखनासाठी ताडपत्रांचा आणि कापडाचा वापर होत असावा. शिवकालापासून पुढे शिलालेख, ताम्रपट, कार्पासपट मागे पडून कागदे सर्वत्र रूढ झालेला दिसतो.

इ.स १९२९ मध्ये लिहिलेल्या 'मानसोल्लास' अथवा 'अभिलषितार्थ चिंतामणी'तील मराठी पदापासून इ.स. १२९० मध्ये लिहिल्या गेलेल्या ज्ञानदेवीपर्यंतच्या मधल्या दीडशे वर्षात काहीही साहित्यनिर्मिती झालेली नसणे अशक्यच आहे. ती उपलब्ध नाही एवढेच.

उपलब्ध ग्रंथांच्या आधाराने मराठी साहित्याचा इतिहास आरंभ यादवकालात होतो, असे दिसून येते. सातवाहन ते यादव हा जसा राजवटीमधल्या बदलाचा काळ आहे तसाच महाराष्ट्री प्राकृत, महाराष्ट्री अपभ्रंश, मराठी हा भावित परिवर्तनाचाही काळ आहे. साहित्यात संस्कृतदेवणी प्राकृताचा अवलंब ही गोष्ट जरी सातवाहनांच्या काळात घडलेली असली तरी धर्मकारणासाठी मराठीचा अवलंब ही घटना यादवकाळातच घडलेली आहे. मराठीच्या आरंभकाळातले उपलब्ध साहित्य मनोविनोदनासाठी लिहिले गेलेले साहित्य नसून जनसाधारणांच्या आध्यात्मिक मुक्तीसाठी लिहिले गेलेले आहे. त्यामुळे मराठी साहित्याचा इतिहास लिहिताना केवळ राजवटींचा इतिहास उपयोगाचा ठरत नाही. राजवटींबरोबरच विविध ग्रंथ आणि संप्रदाय त्यांचाही मागोवा घेणे अटळ ठरते. मराठीतल्या आरंभ काळातल्या साहित्याला विविध

उपासना पंथांनी प्रेरणा दिलेली आहे. त्यातला अत्यंत महत्त्वाचा पंथ म्हणजे नागपंथ होय. नागपंथ हा यादव साम्राज्यातला एक प्रभावी संप्रदाय होता. डॉ.जोगळेकर यांच्या मते, महाराष्ट्रात तेराव्या शतकापासून प्रभावशाली ठरलेल्या महानुभाव, वारकरी आदी सर्व संप्रदायांचा मूलस्त्रोत नाथसंप्रदायच आहे आणि नंतरच्या संप्रदायांनी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात नाथसंप्रदायाचीच तत्त्वे अंगीकारली आहेत, असे दिसून येते.

यादवकाळात साम्राज्यविस्तार झालेला होता. राजवटीच्या आश्रयाने समाजातला एक विशिष्ट स्तर फोफावत जातो आणि बाकीचा समाज समृद्धीच्या फळांपासून वंचित राहातो. यादव काळातल्या संस्कृत साहित्याचा, सामान्य जनतेशी काहीही संबंध राहिलेला नव्हता. पंडित आणि राजाच्या दरबारासाठीच ते लोक लिहीत होते. संस्कृतमध्ये साहित्य विपुल लिहिले गेले. पण त्यात मौलिकता, चैतन्य आणि प्रेरकतेचा अभाव होता, असे दिसून येते.

श्रीपती भट्ट याने १०३९ च्या सुमारास मूळ संस्कृतात हा ग्रंथ रचला व त्यावर संस्कृतात व मराठीत टीकाही लिहिली. मराठीत उपलब्ध असलेली ही टीका अपूर्ण आहे. या ग्रंथाची एकूण ५४ पृष्ठे इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांना सापडली व तीही मूळ मराठी पोथी नसून त्यांच्या मते, १४४७च्या सुमारास केव्हा तरी केलेली तिची नक्कल आहे. ही पोथी राजवाडे यांनी १९९४ साली 'भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक इतिवृत्तांत' छापून प्रसिद्ध केली

'तेया ईश्वररूपा कालाते मि

ग्रंथकर्ता श्रीपति नमस्कारी।।'

अशी सुरुवात करून प्रस्तुत ग्रंथात श्रीपतीने युगे, संवत्सरे, त्याचे स्वामी ऋतू, मास, राशी, तिथी महिन्यातील प्रत्येक दिवसाचे महत्त्व व त्या दिवशी करावयाची कर्तव्ये, शुभाशुभ योग इ.ची चर्चा केली आहे.

महानुभाव पंथांचे संस्थापक चक्रधर यांनी लिहिलेले काही वाङ्मय उपलब्ध नाही. परंतु त्यांच्याविषयीच्या आख्यायिका वेळोवेळी लिहून ठेवल्या गेल्या आहेत. या आख्यायिकांच्या संग्रहाला 'लीळाचरित्र' असे नाव आहे. मराठीतील पहिला गद्य चरित्रग्रंथ म्हणून त्या ग्रंथाला विशेष महत्त्व आहे. महींद्रबास उर्फ म्हाइंभट यांनी हा चरित्रग्रंथ संकलित केला. चक्रहारांच्या उत्तरापंथे गमनानंतर त्यांचे सर्व शिष्य ऋद्धिपूर येथे जमले आणि स्वामींच्या आठवणी, स्मृती, लीळांचे स्मरण करू लागले. यातूनच म्हाइंभटास लीळाचरित्राची प्रेरणा मिळाली. पुढे मग त्याने नागदेवाचार्यांच्या मदतीने चक्रधरांच्या लीळा संकलित केल्या.

मुकुंदराजाने 'विवेकसिंधु' हा ग्रंथ १३६५ च्या सुमारास लिहिला. प्रा. कृ.पां. कुलकर्णी आणि वि. स. भावे या ग्रंथाला मराठीतील आद्य ग्रंथ मानतात. हा ग्रंथ ज्ञानेश्वरी पूर्वीचा असे त्यांचे मत होते.

'विवेकसिंधु' हा ग्रंथ उपनिषदांच्या मंथनातून तयार झालेला शांकर अद्वैत मताचे प्रतिपादन करणारा आहे. विशेषत: 'योगवासिष्ठ' या ग्रंथाचा प्रभाव या ग्रंथावर आढळतो. मायावादाचे सूत्रबद्ध विवेचन या ग्रंथात केले आहे.

विवेकसिंधुत पूर्वार्ध आणि उत्तरार्ध मिळून एकूण १८ प्रकरणे आहेत. १६८४ पर्यंत ओव्या आहेत. पहिल्या भागात सृष्टीची उभारणी, दुसऱ्या भागात सृष्टीचा संहार आणि जीव, प्रपंच, परमेश्वर, जीवमुक्ती यांचे विवेचन केले आहे. या ग्रंथांत मराठीचा भाषेचा गौरव

'धुळी आंतील रत्न । जरि भेटे न करिता प्रेल।

तरी चतुरी येत्न। का न करावा।'

या शब्दांत केला आहे.

जागतिकीकरणामुळे इंग्रजीची मागणी वाढली आता असे दिसून येते की, शहरी भागातील पालक मुलांना

इंग्रजी शाळेत घालत आहेत. त्यामुळे हळूहळू मराठी भाषेचा वापर कमी झालेला दिसून येत आहे. मराठी चित्रपट, नाटक, संगीत, वर्तमानपत्रके हे आजच्या पिढीला मराठीशी जोडून ठेवण्यात आपली जबाबदारी बजावत आहेत. आपण वेळेनुसार बदलले पाहिजे याचा अर्थ असा नाही की आपण आपले मूळ, आपली भाषा मराठी संस्कृती विसरली पाहिजे.

मराठी भाषेतील साहित्य संपदा विपुल आहे. या मराठी भाषेने आपल्याला कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, केशवसुत, बालकवी, शांता शेळके, प्र. के. अत्रे असे अनेक प्रतिभावंत मराठी साहित्यिक दिलेले आहेत. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव यांसारख्या अनेक संतांनी मराठी भाषेचा महिमा सांगितला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषेचे रक्षण व संवर्धन केले.

आज समाजात मराठीला प्रतिष्ठित भाषेचा दर्जा अजून मिळालेला नाही. मराठी भाषेचा वापर कमीत-कमी करण्याकडे लोकांचा कल दिसून येतो. हे असेच दिवसेंदिवस चालू राहिले तर मराठी भाषा बोलीभाषेतून विभक्त व्हायला वेळ लागणार नाही म्हणून मराठी भाषेचे संवर्धन ही काळाची गरज आहे.

केवळ आपल्या बोलण्यातून नव्हे तर आचार-विचारातून मराठी भाषा दिसायला हवी. जागतिकीकरणाच्या या स्पर्धेत आपण सर्वांनी मराठीचा जागर करून तिचे संवर्धन करण्याची जबाबदारी घ्यायला हवी.

'लाभले भाग्य आम्हांस बोलतो मराठी।
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी।।'

◆

---

## नशीब

खूप काही कमावताना
बरंच काही गमवावं लागतं
आयुष्याचं गणित
असंच काहीतरी मांडलेलं असतं
हरविलेल्या गोष्टीपेक्षा
वेगळंच काही घडलेलं असतं
सुखाची अपेक्षा करतो तेव्हा
दुःखच वाटत आलेलं असतं
विचार करता करता
आयुष्याचं सार काही संपलेलं असतं
परमेश्वरा तू तरी सांग
माझ्याच बाबतीत असं का घडतं?

–

# वारकरी संतांची ओळख

**आकांक्षा अनिल प्रभावळे**
बी.कॉम. भाग - ३

'मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा
प्रमाण घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा
राकट देशा, कणखर देशा
दगडांच्या देशा'

अशा शब्दांत गोविंदाग्रजांनी ज्याचे वर्णन केलेले आहे त्या आपल्या महाराष्ट्र भूमीत अनेक संतांनी जन्म घेऊन ही भूमी पावन केली आहे. त्यांनी उज्वल व उत्तम परंपरा घालून दिल्याने महाराष्ट्राचे नाव उन्नत केले आहे. समाजावर अंधश्रद्धा, कर्मकांड यांचा जबरदस्त पगडा होता. यातून लोकांना बाहेर काढण्यासाठी अनेक संतांनी प्रयत्न केले. त्यांची कार्ये पुढीलप्रमाणे :

**१) संत ज्ञानेश्वर :** संत ज्ञानेश्वर आपेगावचे राहाणारे. निवृत्तीनाथ व सोपानदेव हे त्यांचे बंधु मुक्ताबाई ही त्यांची



बहीण. त्यावेळचे कर्मठ लोक या मुलांना संन्याशाची मुले म्हणून नावे ठेवत. त्याचे कारण असे, त्यांच्या वडिलांनी संन्यास घेतलेला होता. घर सोडले होते. पण पुढे गुरूच्या आज्ञेवरून ते परत घरी आले आणि संसार करू लागले. पुढे त्यांनाही चार मुले झाली. हे त्या वेळच्या कर्मठ लोकांना मान्य नव्हते. लोकांनी त्यांना वाळीत टाकले होते. लोक त्या मुलांचा छळ करत होते. आपले ज्ञान प्राकृत भाषेतून देण्याचा निश्चय ज्ञानेश्वर व त्यांच्या तिन्ही भांवडांना श्रेष्ठ वर्णात जन्म घेऊनही वर्णाश्रमाचे चटके सोसावे लागले. जन्माला आलेला प्रत्येक, आपला आध्यात्मिक विकास करू शकतो, हा संदेश त्यांनी त्याकाळातील शोषितांच्या मनात जागृत केला.

संत ज्ञानेश्वरांना वारकरी पंथाचे प्रवर्तक मानले जाते. त्यांचे 'ज्ञानेश्वरी', अमृतानुभाव व 'हरिपाठाचे अभंग' ही साहित्य संपदा उपलब्ध आहे. त्यांना वारकरी पंथात आदराने 'माऊली' असे म्हणतात.

**२) संत नामदेव :** संत नामदेव विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. ते नरसी गावचे राहणारे. त्यांनी अनेक अभंग रचले, कीर्तने केली व जनतेत जागृती निर्माण केली. त्यांनी भागवत धर्माच्या प्रसारासाठी भारतभर संचार केला. त्यांनी लोकांना भक्तीची शिकवण दिली. धर्मरक्षणाचा व भक्तिमार्गाचा खंबीर निर्धार लोकांच्या मनात निर्माण केला. संत नामदेवांनी पुढे भारतभर प्रवास करून मानवधर्माचा संदेश पोचवला. ते पंजाबात गेले तेथील लोकांनाही त्यांनी

समतेचा संदेश दिला. हिंदी भाषेत पदे लिहिली. त्यांची काही पदे आजही शीख लोकांच्या 'गुरुग्रंथ साहिब' या धर्मग्रंथात समाविष्ट आहेत. महाराष्ट्रात तर त्यांचे अभंग घराघरांतून मोठ्या भक्तीने गायले जातात.

**३) संत तुकाराम :** शिवाजी महाराजांच्या काळात तुकाराम व रामदाम हे संत होऊन गेले. संत तुकाराम हे पुण्याजवळीला देहू गावचे राहाणारे. त्याच्या घरी शेतीभाती होती. त्यांचे किराणा मालाचे दुकानही होते. त्यांचे वाडवडील अडल्यानडल्यांना कर्ज देत; पण तुकारामांनी आपल्या वाटणीची कर्ज खते इंद्रायणी नदीमध्ये बुडवली आणि अनेकांना कर्जमुक्त केले. जवळच्या डोंगरावर जाऊन ते विठ्ठलाचे भजन करत. आषाढी-कार्तिकेला पंढरीला जात. कीर्तन करत, अभंग रचत आणि ते अभंग लोकांना म्हणून दाखवत. हजारो लोक त्यांच्या कीर्तनाला येत. शिवरायसुद्धा त्यांच्या कीर्तनाला जात असत. संत तुकाराम लोकांना दया, क्षमा, शांती यांची शिकवण देत.

**४) संत एकनाथ :** संत नामदेव व संत ज्ञानेश्वर यांच्या कार्याची परंपरा संत एकनाथांनी पुढे चालवली. ते पैठणचे राहाणारे. त्यांनी भक्तिमार्गाचा प्रसार केला. त्यांनी भक्तिमार्गाचा अभंग, ओव्या व भारुडे लिहिली. कोणताही उच्चनीच भेदभाव मानू नका, असा त्यांनी लोकांना उपदेश केला. भक्तीचा मोठेपणा त्यांनी लोकांना पटवला. गोरगरिबांना, मागासलेल्या लोकांना त्यांनी जवळ केले. इतकेच नाही तर मुक्या प्राणिमात्रांवर दया करा, असा लोकांनाही उपदेश केला. संत एकनाथ जसे बोलत तसे वागत. संत एकनाथ जन्म संत भानुदास यांच्या कुळात झाला. महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांच्या काळात देवगिरी राजा श्री रामदेवराय यादव यांच्या काळात एक समृद्ध आणि समाधानी राज्य होते. दुर्दैवाने राजाच्या मृत्युनंतर देवगिरी मुस्लीम हल्लेखोरांच्या हाती पडली. संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांनी सुरू केलेली सुधारात्मक आणि उन्नत कामे थांबली.

एकनाथी भागवत, अभंग रचना व भारुडामुळे संत एकनाथ अनाथांचे नाथ म्हणून ओळखले जातात.

**समर्थ संप्रदाय :**

**५) समर्थ रामदास :** रामदास त्याच्या काळात महाराष्ट्राच्या कडेकपारीत 'जय जय रघुवीर समर्थ' अशी रामदासांची गर्जना घुमत होती. त्यांचा जन्म मराठवाड्यात गोदावरीच्या काठी जांब या गावी रामनवमीच्या दिवशी झाला. रामदासांचे मूळ नाव नारायण. पण ते स्वतःला 'रामाचा दास म्हणू लागले. 'दासबोध' या त्यांच्या ग्रंथातून त्यांनी लोकांना मोलाचा उपदेश केला. तसेच त्यांच्या मनाच्या श्लोकांतून त्यांनी लोकांना सद्विचार व सद्वर्तन याची शिकवण दिली. बलोपासनेसाठी त्यांनी ठिकठिकाणी हनुमानाची मंदिरे उभारली. लोकांना शक्तीची उपासना करण्यास शिकवले. 'सामर्थ्य आहे चळवळींचे जो जो करील तयाचे' हा संदेश त्यांनी लोकांना दिला.

महाराष्ट्र ही शूरवीरांची, रांगड्या लोकांची भूमी. या भूमीत आदिनाथ, महानुभाव, वारकरी व सुफी संप्रदायातील संतांनी महान कार्य केले. त्याबरोबरच समर्थ संप्रदाय, दत्तसंप्रदाय यांचेही बहुमोल योगदान भक्ती परंपरेत लाभले.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत विठ्ठल व तीर्थक्षेत्र पंढरपूर हे तर महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव म्हणावे लागेल. या संप्रदायाने दया, क्षमा, शांती, अहिंसा, परोपकार या तत्त्वांना महत्त्व देवून नामस्मरणातून भक्ती व चारित्र्यशुद्धतेचा मूलमंत्र दिला. मानवता, समता, बंधूता या त्रिसूत्रीतून समाजमन घडविले म्हणून महाराष्ट्र हे भारतातील पुरोगामी व सामाजिक-धार्मिक-सांस्कृतिकदृष्ट्या प्रगत राज्य मानले जाते.

◆

# माझी मराठी मायबोली

**तनुजा राजेंद्र थोरात**
बी. कॉम. भाग-१

‘ही माय भूमी, ही जन्मभूमी
ही कर्मभूमी ही आमची ।
महावंदनीय, अतिप्राणप्रिय
ही माय मराठी आमची।।’

मराठी ही आपल्यासाठी केवळ एक भाषा नसून ममतेचे, वात्सल्याचे आणि संस्काराचे बोल आहेत. मराठी भाषा सामर्थ्यवान आणि सुंदर आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस कवी विष्णू वामन शिरवाडकर म्हणजे आपल्या सर्वांचे लाडके कवी, लेखक, नाटककार कुसुमाग्रज यांचा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. कवी कुसुमाग्रज यांचे मराठी साहित्यातील योगदान खूप मोठे आहे. त्यांनी मराठीला ज्ञानभाषा बनवण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या कविता तरुण पिढीमध्ये स्फूर्ती निर्माण करतात. मायमराठीने आपल्यावर सांस्कृतिक छत्र उभारले. जिने आपल्यास व्यक्त होण्यासाठी शब्दांची पाखरण केली. या जगात स्वतःला सिद्ध करण्याची धमक दिली. तिच्याप्रति आदर व्यक्त करण्याचा हा महामंगल दिवस आहे.

‘लाभले आम्हास भाग्य
बोलतो मराठी...
जाहलो खरेच धन्य
ऐकतो मराठी....
धर्म, पंथ, जात एक
जाणतो मराठी...
एवढ्या जगात मायमानतो मराठी’

छत्रपती शिवाजी महाराजांनी मायमराठी भाषेचे आणि संस्कृतीचे रक्षण केले. २७ फेब्रुवारी या दिवशी महाराष्ट्रातील सर्व शाळा तसेच सरकारी कार्यालयांमध्ये मराठी नाटके, शास्त्रीय संगीत, काव्य संमेलने, निबंध स्पर्धा हे कार्यक्रम आयोजित केले. आजच्या पिढीनेही मराठी भाषेची सुंदरता समजून घ्यावी. ‘मराठी असे आमची मायबोली, जरी आज ती राज्यभाषा नसे’ असे कवी माधव ज्युलियन यांनी म्हटले आहे. त्या काळात मराठीला राज्यभाषेचे स्थान नव्हते. तरीही प्रत्येक मराठी माणसाला मराठी भाषेचा प्रखर अभिमान वाटत होता आणि आता तर मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा आहे.

‘असतील जगी लाखो शब्द,
असतील जगी भाषा हजार,
माझ्या मराठी भाषेचा गोडवा,
नित्य आहे सदाबहार’

माझ्या मराठीला फार मोठी जुनी परंपरा आहे. अगदी नवव्या–दहाव्या शतकात मराठीत कोरलेले शिलालेख आज उपलब्ध आहेत. तेराव्या शतकात लिहिलेली ‘ज्ञानेश्वरी’ हा मराठी भाषेतील प्राचीन ग्रंथ. तेव्हापासून आजपर्यंत मराठी भाषा अनेक अंगांनी समृद्ध होत गेली आहे. आता ज्ञानाची कोणतीही शाखा मराठीला अनोळखी राहिलेली नाही. विज्ञान, यंत्रशास्त्र, तंत्रशास्त्र, वैद्यक, न्याय सर्व

शास्त्रे, विविध कला इत्यादी अनेक विषयांवर शेकडो उत्तमोत्तम वाङ्मय निर्माण केले आहे. मराठी भाषेतील ग्रंथांचे आता अनेक भाषांमध्ये भाषांतर झालेले आहे. माझी मराठी भाषा अमृताहूनही श्रेष्ठ दर्जाचे आहे. अशा या मराठीचा मला खूप अभिमान वाटतो.

कवी कुसुमाग्रजही सांगतात,

'माझ्या मराठी मातीचा,
लावा ललाटास टिळा ।'

मराठी भाषेला तेराशे वर्षांपूर्वीपासूनची जुनी परंपरा आहे. त्यामुळे ती अभिजात भाषांमध्ये मोडते. तिच्या कुशीत शिवाजी महाराज, झाशीची राणी, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, लोकमान्य टिळक, राम गणेश आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, बाबासाहेब आंबेडकर अशा थोर माणसांचा जन्म झाला. तसेच संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, संत एकनाथ, जनाबाई या प्राचीन काळातील कवींनी तिच्यावर साज चढवले. खूप पूर्वी म्हणजे देशाला जेव्हा स्वातंत्र्य मिळाले त्या वेळेस माधव ज्युलियन या कवींनी एक गीत लिहिले होते.




'मराठी असे आमुची मायबोली,
जरी आज ती राजभाषा नसे,
नसो आज ऐश्वर्य ह्या माऊलीला
यशाची पुढे दिव्य आशा असे'

आणि खरेच कवीची ही इच्छा सार्थ ठरली. कारण भाषावर प्रांतरचनेमध्ये महाराष्ट्र हे वेगळे राज्य स्थापन झाले आणि मराठीला त्या राज्याच्या राजभाषेचा जवळचा दर्जा मिळाला. त्यानंतरच्या काळात पाहिले तर बहिणाबाई, राम गणेश गडकरी, आचार्य अत्रे, बा. सी. मर्ढेकर कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, वसंत बापट, शांता शेळके आदी साहित्यिकांनी मराठी भाषेत मोलाचे योगदान दिले. अशी ही मराठी भाषा महाराष्ट्र या राजाची राजभाषा झाली आणि तिला तिचे योग्य स्थान मिळाले. आपल्याला जेव्हा स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारत अनेकविध संस्थानांमध्ये आणि ब्रिटिशांची सत्ता असलेल्या प्रांतांमध्ये विभागला गेला होता. या सर्व प्रदेशांमध्ये कुठलाही मेळ नव्हता. म्हणजे वेगवेगळी भाषा बोलणारे प्रदेश एकाच संस्थानाच्या अखत्यारित किंवा ब्रिटिश सरकारच्या अखत्यारित होते. त्यासाठी एकच भाषा असलेल्या लोकांचे राज्य स्थापना केले, तर ते अधिक चांगल्या तऱ्हेने झाले असते. त्यामुळे भाषावर प्रांतरचनेचा कायदा १९५६ साली करण्यात आला आणि त्यानंतर महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात अशी वेगळी राज्ये निर्माण करण्यात आली.

सुरुवातीला महाराष्ट्रात मुंबई नव्हती. परंतु मराठी लोकांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे मोठे आंदोलन उभारले. त्यात आचार्य अत्र्यांसारख्या मोठमोठ्या लोकांनी नेतृत्व केले होते. त्या आंदोलनात १०५ हुतात्म्यांनी बलिदान दिले. सरतेशेवटी लोकेच्छेला मान देऊन १ मे, १९६० या दिवशी वेगळे महाराष्ट्र राज्य निर्माण करण्यात आले आणि मराठीही त्या राज्याची अधिकृत राजभाषा बनली.

'कधी रसाळ, तर कधी मधाळ
तर कधी रांगडी आहे
माझ्या माय मराठीची
अमृताहुनी गोडी आहे।।'

आज महाराष्ट्र राज्यात सरकारी नोकरीत असलेल्या लोकांना मराठी भाषा येणे आवश्यक मानले जाते. शासनाशी पत्रव्यवहार, वेगवेगळी प्रमाणपत्रे मराठीत दिली जातात. स्थानिक भाषेचे वापरातील प्रमाण आणि अनिवार्यता इतर राज्यांनी जेवढ्या प्रभावीपणाने केली आहे तेवढ्या प्रभावीपणे आपणही करणे गरजेचे आहे. म्हणजे मराठीची शान नि तिला मिळणारा मान नक्कीच वाढले, त्यात शंका नाही.

'माझा मराठीचा बोलू कौतुके ।
परि अमृतातेही पैजा जिंके।
ऐसी अक्षरे रसिके मेळविन।।'

या पंक्ती थोर तत्त्वज्ञ, आत्मानुभवी योगी, प्रतिभासंपन्न कवी, भूतदयावादी संत, वारकरी, नाथ, भक्ती संप्रदायाचा प्रेरक अशा ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरी, अमृतानुभव या काव्यग्रंथातील आहेत. जेव्हा 'याचि देही याचि डोळा' त्यांनी समाजसृष्टीचे अवलोकन केले तेव्हा समाजातील सत्य परिस्थिती त्यांच्या लक्षात आली. अशिक्षित, गरीब समाज उच्चवर्णियांच्याकडून नागविला जातो. पिळला जाण्याची कारण अज्ञान होते.

'माझ्या मराठीचा गंध,
जाई-जुई मोगऱ्याचा,
माझ्या मराठीचा संग,
संत साधू सज्जनांचा'

सर्वसामान्य माणसाची बोलीभाषा मराठी होती आणि भगवद्गीता संस्कृत भाषेत प्रचलित होती म्हणून ज्ञानेश्वरांनी 'भगवद्गीतेतील' सार सर्वसामान्य वर्गासाठी ज्ञानेश्वरी रूपे निरूपित केले आणि माझ्या मायबोलीचे हे अलंकाररूपी रसाळ दालन वाचकांसाठी खुले केले. संस्कृत व देशी भाषा, यांचे स्वरूप पाहिले तर येथे 'अलंकारिले कवणे' असा प्रश्न अशी ही आपली मायबोली रसाळ आणि मधुर आहे की तिची गोडी अवीट आहे. मराठी संस्कृती फार प्राचीन आहे. तिच्यातील ठोकताळे, तिचे माधुर्य, चक्रधर, तुकाराम, एकनाथ तसेच रामदास या थोर संतांनी आपला अभंग, कीर्तने आणि श्लोकातून अलगदपणे रसिकांपर्यंत पोहचवले. त्यामुळेच या मराठीवर आणि महाराष्ट्रावर कित्येक वर्षे परकीयांनी राज्य केले. बरीच राजकीय स्थित्यंतरे झाली. पण त्यांना तोंड देण्याचे सामर्थ्य व मनोबल या जीवननिष्ठेनेच दिले. या मायबोलीचा ठसा सामान्यजनावर उमटवला गेला की, प्रबोधन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला बराच काळ प्रेरणा देत राहिले.

'ज्ञानदेवांनी रुजवली
ती भाषा मराठी...
शिवरायांनी टिकवली
ती संस्कृती मराठी...
संतांनी वाढवला
तो वाण मराठी...
आमची मायबोली आमचा अभिमान मराठी।'

महाकाव्य, लघुकाव्य, स्त्रोत, चंपूकाव्य असे विविध काव्यप्रकार, प्राचीन मराठी कवितेत आणून विविध अलंकार व वृत्तरचना मराठीत आणण्याचे काम पंतकवींनी केले. एकंदरीत मराठी भांडार समृद्ध करण्याचे श्रेय संत, पंत आणि तंत कवींचे आहे. संतरचनेपेक्षा अगदी स्वतंत्र वळणाची तारुण्याला मदहोश करणारी व पराक्रमाला उद्युक्त करणारी तंतरचना शाहिरी रचना म्हणून ओळखली जाते. पोवाडे व लावण्या म्हणजे डफावरील थाप व चाळ बांधून थिरकणारे पाय म्हणजे यौवनाला आव्हानच आहे. संत आणि पंत कवींनी लोकजीवनाला ईश्वरीभक्ती शिकवली; परंतु शाहिरांनी लोकांच्या भावना त्यांच्यात शब्दाच व भाषेत मांडल्या.

'कीर्तन, भजन, ओवी, पोवाड्याने,
माझी मराठी सजली,
शब्द अलंकाराचा साज लेवून,
माझी मराठी बहरली'

प्रत्येकाला आपल्या मातृभाषेचा अभिमान असायलाच हवा. मराठी विषयाच्या अनास्थेला जबाबदार कोण असेल,

तर पहिला घटक 'पालन' करणारा 'पालक' हा आहे. आपल्या मुलाला मराठी माध्यमाच्या शाळेत घालावं की इंग्रजी माध्यमात येथून पहिल्या वादाला सुरुवात होते. 'मराठी शाळेचा दर्जा घसरत चाललाय' असा एक आरोप केला जातो. पण हा दर्जा घसरायला जबाबदार कोण आहे? आपण मराठी माणसंच ना? आम्ही कशाला सेंट झेविअर्स इंग्रजी माध्यमाच्या शाळेत रांगा लावतो का नाही? आम्हाला मराठी माध्यमात मुलांना घालावंसं वाटतं. कारण आम्हालाच आमच्या मराठी भाषेचा अभिमान राहिलेला नाही.

'जरी मी खेळत असले इंग्रजी मधला गेम
तरी आहे खूपच माझं मराठीवर प्रेम
इंग्रजीत करतात बर्थडे मेणबत्त्या फुंकून
पण मराठीत असतो वाढदिवस निरंजन ओवाळून
इंग्रजीत म्हणतात थँक्स आणि सॉरी
पण मराठीत म्हणतात माफ करा आणि आहे आभारी
जशी उन्हाबरोबर येथे छाया
तशी आम्ही करतो मराठीवर माया'

लोकभाषा व ज्ञानभाषा या दोन्हीत वर्षानुवर्षे आपल्याकडे फारकतच झाली आहे. यशवंतराव चव्हाण यांनी 'मातृभाषेतून शिक्षण द्यावे'; पण सध्या आपल्या सरकारनेच 'मराठी' भाषेला पर्याय म्हणून जर्मन, आय. टी. असे विषय ठेवले आहेत. साहजिकच अधिक गुण मिळवण्यासाठी अनेक जण जर्मन किंवा आय. टी. ची निवड करतात. पुन्हा मराठी माणूसच मराठी भाषेपासून दुरावतो. परकीय भाषा शिकायला माझा विरोध पण आपल्या मातृभाषेला विसरून चालणार नाही. मराठी संस्कृतीतला 'मातृदिन' आम्हाला माहीत नसतो. आम्ही 'मदर्स डे' सेलिब्रेट (?) करतो. 'श्रावण महिन्यात १५ ऑगस्ट येतो' असे विधान जेव्हा मुलं निबंधात लिहितात, तेव्हा त्याच्या अगाध ज्ञानाची प्रचिती येते. मातृभाषेतून शिकून आपण मागे पडत नाही, हा मुद्दाच कोणी लक्षात घेत नाही. दाक्षिणात्य राज्यात गेल्यावर तर आपल्याला तेथील लोक मातृभाषेचे कट्टर पुरस्कर्ते असल्याचे जाणवते.

महाराष्ट्राची राज्यभाषा असलेली ही भाषा मराठी भाषिकांनी देशभरात नाही तर जगभरात पोहोचवली. स्वातंत्र्यानंतरच्या काळात मात्र तेरा वर्षे लढली, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील कडाडली अन् अखेर १ मे १९६० रोजी भारताच्या बावीस अधिकृत भाषांमध्ये स्थान मिळवून तिने मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य स्थापन केले व त्यानंतर तिला राजाश्रय मिळाला. महाराष्ट्र शेजारील राज्यातही तिचे अस्तिव जाणवते. दक्षिण गुजरात, उत्तर कर्नाटक, उत्तर आंध्रप्रदेश, दक्षिण मध्यप्रदेश या ठिकाणीही मराठी भाषेचा व्यवहारात व संभाषणात वापर होतो म्हणूनच आपल्या मातृभाषेचा महिमा सांगताना कवी कुसुमाग्रजांनी तिच्या समृद्धीपणाचा गौरव करताना लिहिले की,

'माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा
तिच्या संगाने जागल्या दऱ्या-खोऱ्यातील शिळा'

अशी ही समृद्ध असलेली, पर्वतावरून उंच प्रतिमा असलेली मराठी ही आपली मातृभाषा आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. भाषा ही संवाद साधण्याचे व व्यवहार पार पडण्याचे साधन आहे. त्यात प्रमाण आणि बोली असे प्रकार पडतात. प्रमाणभाषा ही प्रशासकीय कामांसाठी तर बोलीभाषा ही संवादासाठी व व्यवहारासाठी वापरली जाते. देश तसा वेश याप्रमाणे दर १२ कोसावर भाषेचे स्वरूप बदलते म्हणून प्रत्येक भाषा मैलामैलावर वेगळी वळणे घेते.

'एक सूर एक ध्यास
छेडितो मराठी
एक संघ एक बंध
गुंजीतो मराठी...'

मराठी भाषा संवर्धनाची जबाबदारी प्रत्येक मराठी माणसाची आहे. आज आपण आपल्या भाषेचा म्हणजेच

आपल्या मायबोलीचा त्याग करून इंग्रजी भाषेचा अवलंब करीत आहोत. इंग्रजी ही काळाची गरज आहे, याबद्दल दुमत नाही; परंतु त्यासाठी आपण मराठीची साथ सोडावी, हे मनाला पटणारे नाही. मराठी भाषा ही अतिशय समृद्ध भाषा आहे. या भाषेने आजपर्यंत अनेक संकटांवर मात करत आपले अस्तिव टिकवले आहे. प्राचीन काळापासून लोकभाषा म्हणून अस्तित्वात असलेल्या या मायमराठीवर आज अनेक आव्हाने आहेत. त्यामुळे मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आपण सर्व मराठी बांधवांनी कृतिशील प्रयत्नही आवश्यक आहे. आपण दैनंदिन जीवनात मराठीचा जास्तीत जास्त उपयोग केला पाहिजे; तसेच मराठीतून बोलताना त्यामध्ये इतर भोळी भाषेतील वाक्याची सरमिसळ होऊ नये, याची सुद्धा काळाची काळजी घेतली पाहिजे.

'भाषा आपुली मराठी महान
वाढवूया तिची शान ।'

लहान मूल जेव्हा जन्माला येतं, तेव्हा ते कुठलीही भाषा शिकलेली नसतं. पण पहिल्यांदा त्याच्या गुजगोष्टी चालतात त्या त्याच्या आईबरोबर! म्हणून त्याच्या मातेची भाषा तीच त्याची मातृभाषा ! अशी आपल्या जन्मापासूनची मैत्रीणच आहे ही मराठी! माझी मातृभाषा! प्रत्येकाचं जीवन हे माती, मायभूमी व मातृभाषा या तीन बिंदूंनी बनलेला एक त्रिकोणच! माती त्याला जन्म देते आणि मातृभाषा तर जन्मापासून त्याला संस्कारांचे बाळकडू पाजत असते. अनुभवाचे बोल त्याला शिकवते. तीच त्याने अंगीकारली नाही, तर इतर कितीही भाषा तो बोलला तरी त्याचं आयुष्य समृद्ध होईल का?

'चंद्रकोर शोभते
आकाशाच्या माथ्यावर
मराठी भाषा दरवळते
मराठी माणसांच्या मना-मनावर'

आपल्याला लाभलेली ही वैभवशाली मराठी भाषा किती प्राचीन आहे! मराठीची गंगा प्राकृताच्या पर्वतातून निघाली; पण तिला तीर्थाचे स्वरूप ज्ञानेश्वरांनी आणले. त्यांनी 'अमृतातेही पैजा जिंके' अशा मधुर भाषेत ज्ञानेश्वरी हा रसाळ ग्रंथ लिहून मराठीच्या वाङ्मयाच्या समृद्धीचे पहिले दालन उघडले आणि पुढे तर या दालनात, क्रमाक्रमाने भरच पडत गेली. रामदासाचे 'मनाचे श्लोक' आणि 'दासबोध' या ग्रंथांनी भक्तिमार्गाबरोबरच संसाराची शिकवण दिली. तुकारामाची 'गाथा' इंद्रायणीत बुडूनही अमर राहिली, असं हे प्राचीन संत वाङ्मय आपल्या मराठी भाषेचं अनमोल लेणं हे आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या ओजस्वी लिखाणाने मराठी भाषा खड्गाप्रमाणे तळपू लागली. नंतर ललित वाङ्मयाला आलेला बहर ओसरलाच नाही. बालकवी, बा. भ. बोरकर इ. कवींनी निसर्गसौंदर्याचं आकंठ पान मराठी रसिकांनी घडविलं. कुसुमाग्रज, मंगेश पाडगावकर, वसंत बापट यांनी आपल्या कवितांमधून नवीन विचारांची चालना दिली. गडकरी, अत्र्यांच्या नाटकांनी विनोदाचा नजराणा दिला.

'मातृभाषा महाराष्ट्राची,
आहे मराठी भाषा,
तिला समृद्ध करण्याची
आहे माझी आशा'

परंतु आज या वैभवशाली मराठीची काय अवस्था आहे? आजच्या विद्यार्थ्यांना शेक्सपिअरची नाटकं घडाघडा पाठ आहेत. पण गडकऱ्यांच्या एकाही नाटकाचं नाव माहीत नाही हे आपलं दुर्दैव! मराठीतून शिक्षण घेणं म्हणजे आज मागासलेपणा समजला जातोय. जरी जगातील ज्ञानाचा खजिना इंग्रजी भाषेत आहे, तरी स्वभाषेतूनसुद्धा कर्तृत्वाने आपण काही मिळवू शकतो, हे रशिया, जपान या राष्ट्रांनी आज सिद्ध केलंय. आज पश्चिमात्य व पौर्वात्य संस्कृती यांचा समन्वय जर साधायचा असेल, तर आपली संस्कृती आपण जपली पाहिजे. म्हणजेच आपण आपली मराठी जपली पाहिजे. कारण 'भाषेची अभिवृद्धी हा देशाचा उत्कर्ष.' थोर नेता चर्चिल म्हणायचा- 'मी एकाच गुन्ह्याबद्दल मुलाला

शिक्षा करेन, तो म्हणजे त्याला आपली मातृभाषा न येणे. देशाचा उत्कर्ष साधायचा असेल तर मराठी भाषेतल्या ग्रंथांचा हा मौलिक ठेवा जपणे, तो वृद्धिंगत करणे हे आपले पवित्र व पहिले कर्तव्य आहे. तरच 'हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू' या ओळी सार्थ ठरतील.

'घासल्याशिवाय धार नाही,
तलवारीच्या पातीला
मराठीशिवाय अर्थ नाही,
महाराष्ट्राच्या मातीला!!'

प्रतिष्ठेच्या पोकळ व आकर्षक कल्पनात गुरफटलेल्या आमच्या मनाला अजूनही इंग्रजीचे आकर्षण आहे. मराठी चार भाषिक सुरक्षित माणसे एकत्र आली, तर ती गप्पा मारण्यासाठी इंग्रजी जवळ करतात. दीडशे वर्षांची राजकीय गुलामगिरी संपली, तरी इंग्रजीची मानसिक गुलामगिरी सोडायला आम्ही तयार होत नाही. कारण आमच्या मायबोलीची थोरवी आजही आम्हाला उमगली नाही. तिचे सामर्थ्य आजही आम्हाला कळले नाही, असेच म्हणावे लागेल. मराठी मायबोलीविषयी लिहिताना सानेगुरुजी म्हणतात की, ''आमच्या मराठीचे भाग्य असे आहे की, तिचा पहिलाच कवी हिमालयाएवढा मोठा महाकवी होऊन गेला. त्याच्या काव्यशक्तीला स्पर्श करणारे सामर्थ्य अजून मराठीत निर्माण झालेले नाही.''

'मराठी म्हणजे गोडवा,
मराठी म्हणजे प्रेम
मराठी भाषा म्हणजे संस्कार,
मराठी म्हणजे आपुलकी
मायबोली माझी मराठी
तिच्यात मायेचा ओलावा
वेगवेगळ्या शब्दालंकारात
घेते हृदयातील खोलावा!'

''पखिआंमध्ये मयारू। व्रुखिआमध्ये कल्पतरू ।
मासांमध्ये मानु थोरू । मराठियेसी ।'

पक्ष्यांमध्ये मोराला आणि वृक्षांमध्ये कल्पतरूला जो मान आहे तोच सर्व भाषांमध्ये मराठीला आहे, असे फादर स्टीफन्स म्हणतो. या पोर्तुगीज परभाषिकाने मराठीचा केलेला गौरव मराठी भाषिकाला अभिमान वाटणारा आहे. संतांना तर मराठीबद्दल उत्कट अभिमान वाटायचा. महानुभाव पंथांचे सर्व धर्मग्रंथ मराठीत आहेत. एकदा केशवदेवाला वाटले की, आपण एक ग्रंथ संस्कृतमध्ये लिहिण्याची व विद्वान पंडितांची मान्यता मिळवावी. त्याने नागदेवाचार्यांना आपला ग्रंथ संस्कृतमध्ये लिहिण्याची अनुमती मागितली. याला नागदेवाचार्यांनी नकार दिला. ते म्हणाले की, ग्रंथ मराठीतच असावा. श्री ज्ञानदेवांनी तर 'माझा मराठाचि बोलू कौतुके। परि अमृतातेही पैजा जिंके।' असे निर्भयपणे सांगून टाकले. अशी ही मराठी मायबोली आहे याचा मला सार्थ अभिमान आहे.

'माय मराठी, साद मराठी
भाषांचा भावार्थ मराठी
चाल मराठी, बोल मराठी
जगण्याला या अर्थ मराठी...'

मराठी काव्याची प्रभात म्हणता येईल असे शाहिरी वाङ्मय म्हणजे लावण्या व पोवाडे केवळ मराठीतच आहेत. संस्कृतपेक्षा मला मराठीच अधिक आवडते. कारण संस्कृतमध्ये नसलेले 'ळ' हे अक्षर मराठीत आहे. संस्कृतसारखा व्याकरणाचा सोस मराठीला नाही. संस्कृतप्रमाणे ती केवळ ग्रंथभाषा नाही. ती एक लोकभाषा म्हणजे जिवंत भाषा आहे. जिवंत भाषा आहे म्हणूनच इतर भाषांतील सुंदर शब्द तिने आत्मसात केले आहेत. आई, काका, अण्णा तिने कानडीतून घेतले आहेत.

'मराठीची धरा कास
सर्वांचा होईल विकास'

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा झाली आहे. पण अजूनही ती उच्चशिक्षणाचे माध्यम बनली नाही, ही खंत आहेच. मराठी राजभाषा तर आहेच; पण महानुभावपंथाने

तिला धर्मभाषाही केले आहे. राघोबादादांनी मराठ्यांचा जरीपटका सतराव्या शतकात अटकेपर्यंत पोहोचवला; पण महानुभावांनी मराठी भाषा त्याच्याही पलीकडे पोचवली आहे. महात्मा फुल्यांनी कॉर्ल मार्क्स इतकेच महत्त्वाचे व प्रखर तत्त्वज्ञान जगापुढे मांडले. ते त्यांचे ग्रंथ मराठीत आहेत. लोकमान्य टिळकांनी आपल्या करारी घोषणेने सारे राष्ट्र गदागदा हलवून टाकले. ती त्यांची अमृतघोषणा ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच’ ही अस्सल मराठीतली आहे. भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठीतूनच दलितांची अस्मिता जागृत केली.

‘स्वराज्य तोरण चढे...
गर्जती तोफांचे चौघडे
मराठी पाऊल पडते पुढे’

आधुनिक काळात मराठीने जसे जागतिक कीर्तीचे विचारवंत निर्माण केले. तसेच तिने इतिहासातही केले. भारतात एक स्वतंत्र आणि वेगळा इतिहास घडवणाऱ्या स्वराज्यसंस्थापक शिवाजीने आपले आज्ञापत्र मराठीतून लिहिले. कोकणी, देशी, कोल्हापूरी, सातारी, पुणेरी, खानदेशी, वऱ्हाडी, नागपुरी अशा विविध लोकबोली असलेली मराठी भाषा वैशिष्ट्यपूर्ण व सुंदर आहे. कवी म्हणतो की, इंद्राच्या दरबारातील सांडलेल्या अमृतातून मराठी बोल निपजले.

‘खेप थेंब मातीनं झेलले।
जस मिरगाचं पानी
वऱ्हाडीच्या शब्दाइले।
वास चंदनाच्या वानी।’

◆



## मी चित्र काढलं

माझी कल्पनाशक्ती चित्र बनू पाहाते तेव्हा
चित्र काढणे माझ्यासाठी अवघड होते
पण जेव्हा ऊर्मीतून भावना कधी जोमाने,
कधी अलगद, चैतन्याने फुलून येते
कॅनव्हासला बिलगू लागते.
तेव्हा – अवघड चित्र गडद गहिरं होतं
सुंदरतेनं जन्म घेत राहातं.

पण अचानक वाटून जातं
हे चित्र मीच रेखाटलं का?

एक अनामिक शक्ती, एक जोम
मला वास्तवातून दूर नेत
चित्रकलेच्या भाषेतील,
रचनांचा अविष्कार घडवत राहाते.
मी एक निमित्त मात्र, मला सारखं वाटत राहातं
मी चित्र काढलं... मी चित्र काढलं...

**– गणेश रंगराव ठोंबरे,**
बी.ए. २

# क्रांतिकारक भगतसिंग

**आरती लक्ष्मण माटके**
बी.ए. भाग - ३



भगतसिंग हे एक महान भारतीय क्रांतिकारी होते. ब्रिटिश साम्राज्याविरुद्धच्या लढ्यात त्यांनी केलेल्या दोन हिंसात्मक कार्यामुळे वयाच्या तेविसाव्या वर्षी इंग्रजांनी त्यांना फाशीची शिक्षा दिली. भगतसिंग यांचा जन्म २८ सप्टेंबर १९०७ ला सध्याच्या पाकिस्तानातील पंजाबप्रांतात लायलपूर जिल्ह्यातील बंगा या छोट्याशा गावी झाला. त्यांच्या आईचे नाव विद्यावती, तर वडिलांचे नाव किशन सिंग होते. तर भगतसिंग यांचे वडील, किशन सिंग आणि काका सरदार अजित सिंग हे दोघे त्याकाळचे लोकप्रिय स्वातंत्र्यसेनानी होते. दोघे गांधीजींच्या विचारांचे समर्थक होते.

आपले वडील व काकांच्या कार्याने भगतसिंग खूप प्रभावित झाले. लहानपणापासून त्यांच्यात देशाविषयी निष्ठा आणि भारताला इंग्रजांच्या तावडीतून मुक्त करणे, ही इच्छा निर्माण झाली. १३ एप्रिल १९१९ ला जेव्हा अमृतसरमध्ये जालियनवाला बाग हत्याकांड प्रकरण घडले तेव्हा भगतसिंग हे बारा वर्षांचे होते. या घटनेचा खोल प्रभाव त्यांच्या मनावर पडला. भगतसिंग यांच्या नसानसांत देशप्रेम पळू लागले होते. १३ वर्षांच्या वयात शाळा सोडून भगतसिंग यांनी लाहोरच्या नॅशनल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्या काळात त्यांची ओळख अनेक राजकीय नेत्यांशी झाली. याच कॉलेजमध्ये त्यांनी युरोपियन क्रांतिकारी आंदोलनाचा अभ्यास केला, या अभ्यासातून त्यांना खूप प्रेरणा मिळाली.

१९२१ साली जेव्हा गांधीजींनी असहयोग आंदोलन सुरू केले तेव्हा भगतसिंग त्या आंदोलनात सामील झाले. परंतु चौरीचौरा येथील घटनेने व्यथित होऊन गांधीजींनी आपले आंदोलन थांबवले. हे सर्व पाहून भगतसिंग निराश झाले. त्यांनी विचार केला की अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र मिळवणे कठीण आहे, म्हणून त्यांनी सशस्त्र क्रांतीने देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा निश्चय केला.

सायमनच्या कमिशनच्या विरोधात सुरू असलेल्या आंदोलनात लाला लजपत राय यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी भगतसिंग व चंद्रशेखर आझाद यांनी पोलीस अधिकारी सौंडर्सची गोळी मारून हत्या केली. या घटनेनंतर इंग्रजांनी त्यांना पकडण्यासाठी, आपली संपूर्ण शक्ती लावली. परंतु भगतसिंग व चंद्रशेखर आजाद हे दोघे शिक्षेपासून वाचवण्यासाठी रूप पालटून हावडा येथे गेले.

याच्या काही काळानंतर इंग्रजांना भारतीयांची शक्ती दाखवून देशवासियांना जागृत करण्यासाठी त्यांनी विधानसभेत बॉम्ब टाकण्याचा निर्णय घेतला. ठरलेल्या योजनेनुसार ते आपले सहकारी बटुकेश्वर दत्त यांच्यासोबत विधानसभेच्या सत्रात पोहोचले व त्यांनी बॉम्ब फेकला. या हल्ल्यात कोणीही ठार होणार नाही, याची त्यांनी काळजी घेतली. बॉम्ब फुटल्यानंतर त्यांनी 'इन्कलाब झिंदाबाद' चे नारे दिले. यानंतर त्यांनी स्वत:ला पोलिसांच्या ताब्यात दिले. इंग्रजांनी त्यांना आजीवन कारावासाची शिक्षा ठोठावली. परंतु जेव्हा इंग्रजांना कळाले की, भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांनीच पोलीस अधिकारी सौंडर्सची हत्या केली तेव्हा त्यांनी तिघांना फाशीची शिक्षा सुनावली.

२३ मार्च १९३१ ला आपल्या फाशीची दिवशी हे तिघे वीर 'इन्कलाब झिंदाबाद', 'भारत माता की जय' हे नारे देत जात होते. सरदार भगतसिंग हे देशाच्या महान क्रांतिकारी नेत्यांपैकी एक होते. देशाच्या स्वातंत्र्यात त्यांनी दिलेले बलिदान खरोखर प्रशंसनीय आहे. आज जरी भगतसिंग आपल्यासोबत नाहीत, तरी त्यांची देशभक्तीची भावना आणि बलिदान सर्वांना प्रेरणा देत राहील.

## कॉलेज म्हणजे काय ?

कॉलेज म्हणजे?
कॉलेज म्हणजे काय असतं?
तारुण्याच्या वेलीवर
उमलणारं फूल असतं!
आयुष्याच्या काळोखात
दिशा दाखवणारं तेज असतं!
गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली
सावली देणारं झाड असतं!
ध्येयासाठी पाखरांना
दिशा दाखवणारं आकाश असतं!
अनजानांच्या दुष्काळात
जनाचा सुकाळ देणारा गारवा असतो!
हे शेवटी जो सर्व अनुभवतो त्यालाच कळतं
कॉलेज म्हणजे काय असतं!

**– जयराज कोळी**
बी. ए.–१

# पु.ल. देशपांडे : हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व

**काजल सुरेश वाईंगडे**
बी. कॉम. भाग-३

'पुलस्पर्श होताच, दुःखे पळाली
नवा सूर, आनंदयात्रा मिळाली
निराशेतुनी माणसे मुक्त झाली
जगू लागली, हास्यगंगेत न्हाली'

सुप्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकरांनी पु.ल.विषयी काढलेले वरील गौरवोद्गार अगदी सार्थ आहेत. पु.ल. हे माझे आवडते साहित्यिक आहेत. पु.ल. म्हणजे पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे हे केवळ माझेच नाहीत; तर अवघ्या महाराष्ट्राचे लाडके साहित्यिक आहेत. अशा अष्टपैलू कलावंताचा जन्म १९१९ मध्ये झाला. त्यांचे शिक्षण मुंबई व पुणे येथे एम.ए.एल.एल.बी. पर्यंत झाले. त्यांच्या साहित्य वाचनाच्या आवडीमुळे विशेषकरून बंगाली साहित्याबद्दल त्यांना आत्मीयता असल्यामुळे, संस्कृतबरोबर बंगाली भाषा ते परिश्रमपूर्वक शिकले. सुरुवातीच्या काळात त्यांनी लिपिक, शिक्षक पुढे, कॉलेजात प्राध्यापक पदाचा कार्यभारही सांभाळला. कलेच्या प्रांतात त्यांनी मुशाफिरी केली. आकाशवाणीवरील काही वर्षे नभोनाट्य विभागाचे प्रमुख म्हणून काम केले. विशेष म्हणजे दिल्ली दूरदर्शनावरील कार्यक्रमांचे ते पहिले निर्माते होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू आहेत. ते जसे उत्तम लेखक होते, उत्कृष्ट कलाकार होते, तसेच यशस्वी दिग्दर्शक होते. संगीत दिग्दर्शक करून काही उत्तम चाली त्यांनी चिरंजीव केल्या आहेत. त्यातलीच एक म्हणजे 'नाच रे मोरा' हे गाणे आजही ताजे, टवटवीत वाटते. त्यांच्या चालीवर, लयीवर मुलांचे पाय थिरकू लागतात.



पु.ल. देशपांडे यांनी मराठी साहित्याला खूप उंचावर नेऊन ठेवलेले आहे आणि त्यांची विनोदबुद्धी तर अफाट आहे, म्हणून मला पु.ल देशपांडे हे खूप आवडतात.

पुलंच्या साऱ्या यशाचे बीज त्यांच्या लहानपणापासूनच आढळते. आपल्या भोवताली घडणाऱ्या घटना, भोवताली

भेटणारी माणसे यांचे ते सूक्ष्म निरीक्षण करत असत व त्या साऱ्या लखवी त्यांच्या स्मृतिपटलावर अचूक टिपल्या जात असत म्हणून तर त्यांच्या 'बटाट्याची चाळ' या पुस्तकातून आपल्याला एवढी माणसे भेटतात. त्यातला प्रत्येक माणूस वेगळा आहे. पुलंच्या प्रज्ञेचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांच्या लेखनातील हास्य व काळाव्य यांचा अप्रतिम मिलाप असलेला विनोद! शब्दकोश शब्दाशब्दात ते कोटी करत असतात. यांचे 'कोट्याधीश' हे पुस्तक सर्वांना कोणत्याही परिस्थितीत खुणवते.

पुलंनी नाट्यलेखनही केले. त्यातल्या बऱ्याच नाटकांनी मूळ कल्पना परभाषीय साहित्यातून घेतली गेली. पण त्यावरचा साज खास मराठी आहे म्हणून पुलंची 'फुलराणी' परकी वाटत नाही. ती खास मराठमोळी वाटते. 'तुझे माझे तुजपाशी' हे पुलंचे स्वतंत्र नाटक. त्यातील काकाजीची व्यक्तिरेखा चिरंजीव आहे.

पुलंनी अनेक व्यक्तिचित्रे रंगवली. 'व्यक्ती हे वल्ली' 'गणगोत, 'मैत्र' यातील व्यक्तीचे आपल्याशी गणगोत जुळते. 'अंतु बर्वा', 'चितळे मास्तर' आजही वाचकांचे डोळे ओले करतात. त्यांच्या या लेखनात विनोदबरोबर करुणरस जागोजाग आढळतो. अपूर्वाई, पूर्वरंग, वंग देश अशा अनेक पुस्तकांतून पुलंनी विविध स्थाने साकार केली. त्यांची निळाई वाचल्यावर ते स्थळ न पाहाताही, पाहिल्याचा आनंद आपण मिळवू शकतो. स्वानंदासाठी काव्यवाचन करता करता त्यांना जवळपास शेकडो कविता मुखाप्रैत्य होत्या.

'देणाऱ्याचे हात हजारो
दुबळी आमची झोळी'

या उक्तीचा प्रत्यय पुलंबाबत होतो. पुलंनी वर्णन केलेली स्थळे आपण जेव्हा पाहातो तेव्हा आपल्याला पुन: प्रत्ययाचा आनंद मिळतो. पु.ल. मधील साहित्यिक हा खरा साहित्यप्रेमी होता. त्यामुळे त्यांनी अनेक नवोदित साहित्यिकांना वेळोवेळी उत्तेजन दिले. त्यांनी वेळोवेळी अनेक अभ्यासपूर्ण भाषणे केली. ती 'श्रोतेहो' इत्यादी तीन पुस्तकात संकलित करण्यात आली आहेत. महाराष्ट्र शासनाने त्यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

पुलंनी जीवनभर लोकांना आनंद दिला. आपल्या साहित्यातून एकपात्री प्रयोगातून मिळालेले आपले लक्षावधी रुपये त्यांनी विविध सत्कार्यालाही दान केले. आपण केलेले दान इतरांना समजू नये, अशी त्यांची धडपड असे. त्यामुळे १२ जून २००० रोजी पुलंचे निधन झाले तेव्हा आपल्याच घरातील कोणीतरी गेले अशी सर्वांचीच भावना झाली होती.

'नसती उठाठेव करता करता
विनोद ज्यांचे खुलले हो
पु.ल ज्यांना कळले हो
खरे जीवन त्यांना कळले हो'

◆



## फौजी

देशासाठी आयुष्य वाहून देतो.
तो फौजी...

रात्र असो किंवा दिवस असो
देशाच्या सीमेवर उभा असतो
तो फौजी...

ऊन असो, पाऊस असो
तरी देशाचे संरक्षण करतो
तो फौजी...

वेळ असो किंवा काळ असतो
लढण्यासाठी सदैव तत्पर असतो
तो फौजी.....

सुख असो किंवा दुःख असो
घरदार सोडून काळीज घट्ट करतो
तो फौजी...

जगणं असो किंवा मरण असो
बंदुकीच्या गोळ्या झेलतो
तो फौजी...

आपल्या कुटुंबापासून दूर राहून,
सर्व ऐशो आरामाची जिंदगी त्याग करून,
जो भारतवासियांचे रक्षण करतो
तो फौजी...

सियाचिन सारख्या सर्वात उंच युद्धभूमीवर,
जेथे ५०°Cअंश सेल्सियस इतके थंड तापमान असतं,
तरी स्वत:च्या जिवाची पर्वा न करता
जो शत्रूशी दोन हात करतो
तो फौजी...

जम्मू काश्मीर सारख्या दुर्गम भागात
जो आतंकवाद्यांना कंठस्नान घालतो
तो फौजी...

इंडो-पाक बॉर्डरसारख्या अति उष्ण प्रदेशात
जेथे ५०°C इतकी उष्णता असते,
तरी डोळ्यात तेल घालून,
जो शत्रूवर नजर ठेवतो
तो फौजी...

स्वतःसाठी, आपल्या कुटुंबासाठी तर सगळेच
जगतात,
पण आपलं सारं आयुष्य, जो आपल्या
मातृभूमीसाठी वेचतो
तो फौजी...

**– रेवती शिवाजी आदमाने**
बी.ए. भाग १

## ती व्यक्ती

आवड ती आवड असते
आवडणारी व्यक्ती आपली गरज असते
प्रेमाची बाग तिच्याशिवाय फुलत नाही
प्रेम करणारी लाखभर मिळतील पण
त्या एका व्यक्तीची कमी भरून निघत नाही.

ऊर्जेचा स्रोत असते.
श्वासानंतरची गरज असते.
मायेचा झरा तिच्याशिवाय वाहात नाही
लळा लावणारी अनेक असतील पण
त्या एका व्यक्तीची कमी भरून निघत नाही.

मनातली कामना असते.
हृदयातली भावना असते.
तिच्याशिवाय आपुलकीचा सागर वाहात नाही
मान देणारे हजार मिळतील पण
त्या एका व्यक्तीची कमी भरून निघत नाही.

लोक म्हणतात एक व्यक्ती
गेल्याने दुनिया संपत नाही
पण हे कोणालाच कळत नाही की
लाखभर लोक मिळाले तरीही त्या
एका व्यक्तीची कमी भरून निघत नाही.

**– धनश्री जयवंत मुगडे**
बी. ए. –२

## जगायचं राहून गेलं

सगळे पाहात होते मला
मी निपचित पडलो होतो
बहुतेक आसवांच्या धारेने
चिंब भिजलो होतो
कोणीतरी गात होते माझे गुणगान
अनेकांनी काढलीच नव्हती वर मान
आज माझ्यासाठी अनेक रडत होते.
पण माझे मात्र त्यात कोणीच नव्हते
मरूनही मी अखेरचा श्वास घेतला
पण जिवाला जीव देणारा व्यक्ती नाही भेटला
कोणीतरी दिलं माझ्या शरीराला दहन
त्या अग्नीचे प्रत्येक चटके केले सहन
आठवत होते माझ्या बालपणाचे दिवस
जन्मासाठी माझ्या आईने बोलला होता नवस
आपल्या माणसांची लागली होती आस
माझ्यासाठी कोणी आलं नाही खास
शेवटी आपल्या माणसांना पाहायचं राहून गेलं
मरता मरता थोडं जगायचंही राहून गेलं

**– कु. दिव्यानी दत्तात्रय भडगावे**
बी. ए.–२

## मी उभी खंबीर आहे

पेटलेल्या वादळांनो,
मी उभी खंबीर आहे.
तुम्ही यावे मी लढावे,
मनी मोठा धीर आहे.

भय ना मज उरले भयाचे,
कुजकी ही जंजीर आहे.
काचेच्या रे ठिसूळ राजा,
स्वभाव आता वजीर आहे.

या लढा लढा अन् लढा,
आज माझ्यात प्राण आहे.
वेगळे युद्ध त्यांचे माझे,
मजला ही आता भान आहे.

पेटलेल्या वादळांनो,
मी उभी खंबीर आहे.
तुम्ही यावे मी लढावे,
मनी मोठा धीर आहे.

**– कु. संजश्री नामदेव घुणके**
बी. ए. –३



## आयुष्य

आयुष्यभर सोबत असून,
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही,
एकमेकांस दिसत नाही.

हरवला तो आपसांतला,
जिव्हाळ्याचा संवाद,
एकमेकांस दोष देऊन,
नित्य चाले वादविवाद.

धाव धाव धावतो आहे,
दिशा मात्र कळत नाही.
हृदयाचे पाऊल कधी,
हृदयाकडे वळत नाही.

क्षण एक येईल असा,
घेऊन जाईल हा श्वास.
अर्ध्यावरच थांबलेला,
असेल जीवनप्रवास.

अजूनही वेळ आहे,
थोडं तरी जगून घ्या.
सुंदर अशा जगण्याला,
डोळे भरून बघून घ्या.

**– निकिता किरण कांबळे**
बी.ए. – १

## जीवन असंच जगायचं असतं

थोडं दु:ख थोडं सुख झेलायचं असतं,
कळीसारखं सुंदर फुलात उमलायचं असतं,
जीवन असंच जगायचं असतं.

वाऱ्यासंगे भिरभिरायचं असतं,
उन्हासंगे तळपायचं असतं,
पावसासंगे बरसायचं असतं,
जीवन असंच जगायचं असतं.

अत्तरासंगे दरवळायचं असतं,
भुंग्यांसोबत गुणगुणायचं असतं,
जीवन असंच जगायचं असतं.



फुलपाखरासंगं फिरायचं असतं,
सप्तरंगात डुंबायचं असतं,
जीवन असंच जगायचं असतं.

भूतकाळासंगे आठवायचं असतं,
वर्तमानासंगं खुलायचं असतं,
जीवन असंच जगायचं असतं.

दु:खाला जवळ करून,
भविष्यकाळ घडवायचा असतो,
जीवन असंच जगायचं असतं.

**– निकिता किरण कांबळे**
बी.ए. -१

# हिंदी विभाग



'कभी फुलों की तरह मत जीना,
जिस दिन खिलोगे बिखर जाओगे,
जीना है तो पत्थर बन कर जिओ,
किसी दिन तराशे गए तो खुदा बन जाओगे।'
– हरिवंशराय बच्चन

**विभागीय संपादक**
**प्रा. मारुफ मुजावर**

# अंतरंग


## गद्य विभाग

- **ऑनलाईन समाज की चुनौतियाँ** /
  पुजारी कोमल बसवराज, बी. ए. भाग - तीन
- **भारतीय छात्रों का विदेशों में जाना** /
  भडगावे दिव्यानी दत्तात्रय, बी. ए. - दोन
- **भाषा शिक्षण : स्वरूप** /
  माळी अभिषेक महादेव, बी. ए.- तीन
- **उसे इस पर गर्व होगा** /
  महाजन मयुरी मनोहर, बी. ए.-दोन
- **प्रवासी भारतीयोंवाले देश में हिंदी** /
  मुलाणी खदिजा सादिक, बी. ए.-दोन
- **हिंदी भाषा और मराठी भाषा का आपसी रिश्ता** /
  पाटील अश्विनी तानाजी, बी. ए.- तीन

## पद्य विभाग

- **जीवन** /
  ठोंबरे गणेश रंगराव, बी. ए. भाग- दोन
- **अपनी दास्तान** /
  चौगुले दर्शन राजेंद्र, बी. ए. भाग- दोन
- **जिंदगी का सफर** /
  मोमीन झियामूस्तफा दिलावर, बी. ए. भाग- दोन
- **मेरे गुरू** /
  चौगुले दर्शन राजेंद्र, बी. ए. भाग- दोन
- **नारी** /
  शेख सानिया गुलामकादर, बी. ए. भाग- तीन
- **मानव** /
  बिरांजे उदय ज्ञानू, बी. ए. भाग- तीन
- **शायरी** /
  मोमीन रेहान जमीर, बी. ए. भाग- एक

# ऑनलाइन समाज की चुनौतियाँ

**- पुजारी कोमल बसवराज**
बी. ए.-३

मीडिया और समाज का रिश्ता बहुत गहरा है। लोकतांत्रिक व्यवस्था में समाजप्रति मीडिया की जवाबदेही भी ज्यादा है। यही कारण है कि उसे लोकतंत्र का चौथा स्तंभ कहा जाता है। मीडिया ने समाज के बीच अपनी सार्थकता को स्थापित किया है। वर्तमान परिपेक्ष्य में समाज की अपेक्षाएँ मीडिया से बढ़ी है। और उसे नागरिकों के अधिकारों की लड़ाई लड़नेवाले माध्यम के रूप में देखा जाता है। मीडिया ने सदैव अपने सामाजिक उत्तरदायित्वों को बखुबी निभाया है। इसके लिए संघर्ष किया और कुर्बानियाँ भी दी। मीडिया ने पत्रकारिता के मूलभूत आदर्शों व मूल्यों, निष्पक्षता एवं सच को निभाते हुए सत्ता और शासन के दबाव की परवाह नहीं की और सत्ता को आईना दिखाने का काम करते हुए वह समाज की कसौटी पर खरा उतरा। इसने अभिव्यक्ती की स्वतंत्रता को श्रेष्ठ आयाम दिए और यदि समाज दिग्भ्रमित हुआ तो उसे भी दिशाबोध कराने का काम किया। सामाजिक जागरूकता लाने में मीडिया का योगदान अतुलनीय है। वर्तमान में सोशल मीडिया ने पूरे विश्व को जोड़ रखा है। सोशल मीडिया का माध्यम जैसे फेसबुक, यु-ट्यूब और ट्विटर आदि के बढ़ते प्रभाव से इसकी ताकत और बढ़ गई है। क्योंकि वेबसाइट पर बिताए जानेवाले कुल समय का एक-चौथाई हिस्सा सोशल नेटवर्किंग साइट पर खर्च किया जाता है। जिससे हर न्यूज मीडिया और वेबसाइट जुड़ी है और इस तरह यह ऑनलाइन दुनिया के लोगों की खबरों की तलब को पूरा करने का काम कर रहा है।

क्योंकि कॉम्प्युटर मोबाईल के प्रति जागरूकता में भी बढ़ोतरी हो रही है और यह पूरी बढ़त अप्रत्यक्ष और प्रत्यक्ष रूप से वेब मीडिया के विस्तार और उच्चतर भविष्य का संकेत है।

सोशल मीडिया के रूप में ऑनलाईन समाज ने पूरे विश्व में पाँव पसारे है। समृद्ध लोकतांत्रिक मूल्यों एवं अभिव्यक्ति की स्वतंत्रता के लिए जाना जाने वाला हमारा देश भी इस नवोदित सोशल मीडिया के प्रभाव में है। हम मीडिया के प्रभाव में है। हम मीडिया के इस नये चेहरे की उपादेयता से इंकार नहीं कर सकते, क्योंकि इसने 'ग्लोबल विलेज' की अवधारणा को साकार करते हुए वैश्विक स्तर पर जहाँ ज्ञान और जानकारी के भंडार को समृद्ध बनाया है, वहीं नज़दीकियाँ भी बढ़ाई है। मानव समाज के फलक को विस्तार देने का काम इसने किया है। इन तमाम खुबियों के साथ आपत्तिजनक व अश्लील सामग्री को परोसने के कारण बदनामी भी सोशल के हिस्से आयी है। और इसके कारण विवाद भी बढ़े है। देश की समरसता, एकता व अखंडता के लिए भी खतरा बढ़ा है, वही इनके जरिए साइबर अपराध को भी बढ़ावा मिला है।

इंटरनेट ने दुनिया बदल दी है। मीडिया जगत भी इससे अछुता नहीं रहा है। प्रौद्योगिक ने पुरे मीडिया का चेहरा ही बदल कर रख दिया है। ऑनलाइन पत्रकारिता के इस युग में सुचनाएँ पंख लगाकर उड रही है। मीडिया के परंपरागत तौर-तरीकों के बरकस इंटरनेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप, चिप, मेमरी कार्ड, डाटा-कार्ड, मदरबोर्ड और कार्ड-रीडर ने पत्रकारिता एवं सुचना के क्षेत्र में नयी दुनिया रच डाली है, जिसने सचमुच सुचना क्रांती सार्थकता प्रदान की है। मीडिया के इस बदले हुए स्वरूप ने पत्रकारिता को आसान बनकर इसकी पहुँच को भी बढ़ाया है।

ऑनलाइन अखबारों की शुरुवात हो चुकी है।

यकीनन ऑनलाइन पत्रकारिता ने मीडिया को नूतन संस्पर्श के साथ नये आयाम भी दिए है। जहाँ ट्विटर और फेसबुक जैसी सामाजिक नेटवर्किंग साइट्स ने अभिव्यक्ति और वैचारिक अदान-प्रदान की है। वही ब्लॉग के माध्यम से संवाद बढ़े है। भारत में इस समय ६ करोड़ से भी ज्यादा लोग फेसबुक का इस्तेमाल कर रहे है। ट्विटर का इस्तेमाल भी लगभग एक करोड़ भारतीय कर रहे है। यह संख्या मामूली नहीं कही जा सकती है।

मीडिया के इस नये स्वरूप ने सोशल मीडिया को भी स्थापित किया है। जिससे नजदिकियाँ बढ़ी है। इसके दूसरे फायदे भी है। अब यू-ट्यूब को ही लीजिए यह युवाओं के लिए उपयोगी साबित हो रहा है। कुछ समय पहले अमेरिका के एक छोटे प्रोडक्शन हाऊस ने वग्नफूने 'एजेंट्स ऑफ सिक्रेट स्टॉफ' नाम से ३५ मिनिट की फिल्म यु-ट्यूब पर प्रसारित की जिसे एक हफ्ते के भीतर २० लाख से ज्यादा लोगों ने देखा। इस पर विज्ञापनों को दिखाकर भी लाभ उठाया जा सकता है। भारतीय सोशल नेटवर्किंग साइट आईबीबों ने द हंट नाम से वेब सिरीयल बनाया। खास बात यह रही कि इससे निर्माण से जुड़े सभी सदस्यों का चुनाव सोशल नेटवर्किंग साइट से हुआ है। मुंबई और चेन्नई जैसे महानगरों में कंपनियाँ अब सोशल मीडिया से जुड़े पदों के लिए विज्ञापन निकालने लगी है। इससे इस क्षेत्र में संभावनाओं के नये द्वार खुले है। ट्विटर-फेसबुक जैसी सोशल नेटवर्किंग साइट्स अब मनोरंजन तक ही सिमित नहीं है। इससे आगे जाकर ये खबर देने और पाने में अहम भूमिका निभा रही है। इतना ही नहीं, सोशल मीडिया का मंच पारंपारिक मीडिया संस्थानो के लिए लोगों की प्रतिक्रिया जानने, रायशुमारी करने, अपनी करने तथा कराने का जरिया भी बन रहा है।

मीडिया लोकतंत्र के चौथे स्तंभ के रूप में समाज को मजबूत दिशा दे रही है। लोकहित की रक्षा के लिए सरकार पर नियंत्रण रखते हुए लोकतांत्रिक प्रक्रिया को मजबुती प्रदान करने का कार्य मीडिया के द्वारा हो रहा है। वर्तमान समाज में वैज्ञानिक चेतना का विकास हो रहा है, जिससे कृषि उत्पाद दर और परिवार कल्याण को प्रोत्साहन मिल रहा है। इंडियाज द मोस्ट वाँटेड, तहलका डॉट कॉम, सीआईडी और अन्य खोजी टेलिव्हिजन कार्यक्रमों के माध्यम से पुलिस विभाग को सहयोग और सही दिशा एवं गति मिल रही है। खेल का मैदान भी मीडिया से अछुता नही है। इसके द्वारा खेलों की जानकारी के साथ-साथ राष्ट्रीय एवं आंतरराष्ट्रीय भावनाओं का विकास हो रहा है। महत्त्वपूर्ण तथ्यों की जानकारी एवं स्वास्थ के प्रति जागरूक समाज का निर्माण मीडिया की देन है।

ब्लॉग, फेसबुक, ट्विटर, यु-ट्यूब आदि नेट की ही देन है। सुचना और संचार क्रांती के इस युग में वैश्विक स्तर पर सामाजिक संपर्को को जोड़ने या अपनी बात को तत्काल दूसरों तक पहुँचाने में सोशल नेटवर्किंग वेबसाइट्स का कोई विकल्प नहीं है। ये साइट्स संदेशों के अदान-प्रदान का त्वरित व सुगम माध्यम बन चुकी है। यही कारण है कि इनका दीवाना है। इंटरनेट संवाद और जानकारियों का अथाह भंडार है। सोशल नेटवर्किंग वेबसाइट्स ने सिर्फ राष्ट्रीय स्तर पर, बल्कि वैश्विक स्तर पर अभिव्यक्ति को नये आयाम दिए हैं और विश्व गाँव की परिकल्पना को साकार किया है। इसी के साथ सामाजिक और बौद्धिक विकास को भी गति दी है। सच तो यह कि इंटरनेट आज विकसित जीवनशैली वाले वर्ग के एक ऐसा हिस्सा बन चुका है।

आंतरराष्ट्रीय और राष्ट्रीय दोनों स्तरों पर सोशल मीडिया के कुछ बहुत ही सकारात्मक परिणाम देखने को मिल चुके हैं। मसलन कुछ समय पहले अरब देशों में जहाँ सोशल मीडिया ने युवकों को एकजुट करते हुए तानशाही के खिलाफ क्रांति को संभव बनाया वहीं भारत में भ्रष्टाचार के खिलाफ छेड़े गए राष्ट्रव्यापी अभियान को सशक्त बनाने में महत्त्वपूर्ण भूमिका निभाई।

◆

# भारतीय छात्रों का विदेशों में जाना

**भडगावे दिव्यानी दत्तात्रय**
बी. ए. - २

आज के देश के कर्ता वृक्ष की ढलती छाया है, किनारे के ढहते पेड़ है। छाया को प्रखर प्रकाश और किनारों की मजबुती देनेवाला सूर्य तो आज के विद्यार्थी ही है। उनके मजबूत कंधे किसी भी प्रकार का कोई भी बोझ उठा सकते हैं। लेकिन उस समय गर्व के साथ साथ दुःख भी होता है, जब अपनी देश की प्रतिभाएँ विदेशों में जाकर अपनी प्रतिभाओं की पताकाएँ लहराती है।

पूर्वकाल की तरह आज भी देश में प्रतिभाओं की कोई कमी नहीं है, किन्तु उनकी स्थिती चिंताजनक बनी हुई है और चिंता का विषय है, प्रतिभा का पलायन । यह ऐसा रोग है, जो देश के विकास को खा रहा है। उसके अंतर्गत रोजगार और बेहतर अवसरों के लिए देश के बुद्धिमान और अति कुशल व्यक्ति विदेशों में जाकर बस रहे हैं।

वास्तव में प्रतिभा पलायन कोई नई समस्या नही है और न ही किसी एक देश तक सिमित है। यह देश की पुरानी समस्या है। विश्व के अधिकतर विकसनशील देश इससे पिडित है। लेकिन इस सबसे अधिक नुकसान भारत का हो रहा है। यहाँ हर वर्ष ६००० ते १०,००० तक छात्र विदेशों में जाते है। इनमें से ७५ से ८० प्रतिशत प्रतिभाओं का पलायन पश्चिम के अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, जर्मनी और इंग्लैंड की ओर होता है, शेष २०-२५ प्रतिशत छात्र विश्व के अन्य विकसित देशों में चले जाते हैं।

चिकित्सक, इंजिनियर आदि तैयार करने में ही हमारे देश की अपेक्षा अमेरिका में दो तिहाई लागत अधिक लगती है। इस तरह दुसरे शब्दों में भारत-अमेरिका को ज्ञान-दान की बौद्धिक सबसिडी दे रहा है। जिसकी लागत अमेरिका द्वारा भारत को दी जा रही। सुद राशि से दुगुना है। इसका अर्थ यह भी हुआ कि हमारा देश श्रेष्ठतम्, संसाधनो का निर्यात सब से कम मूल्य में कर रहा है। चिंतनीय स्थिति यह है कि देश के सर्वोच्च इंजिनियरिंग संस्थान आई-आई टी से तैयार होनेवाले इंजिनियरो में से ६० प्रतिशत छात्र विदेशों की राह पकड़ लेते है। इसी प्रकार अखिल भारतीय आयुर्विज्ञान चिकित्सा संस्थान से प्रशिक्षित चिकित्सकों में से ५० प्रतिशत उच्च शिक्षा एवं नौकरी के बहाने विदेशों में चले जाते हैं। एक बार विदेश पहुँचने के बाद ये प्रशिक्षित मानव संसाधन विदेशों की राष्ट्रीय आय की वृद्धि में महत्त्वपूर्ण योगदान देते है। औद्योगिक रूप से विकसित राष्ट्रों में नागरिकता प्राप्त भारतीय विशेषज्ञों की संख्या ७००० तक पहुँच चुकी है। पलायन करनेवालो में सबसे अधिक ३२ प्रतिशत डॉक्टर, ५ प्रतिशत व्यावसायिक तथा शेष ६३ प्रतिशत अन्य विषयों के विशेषज्ञ होते है।

अमेरिकासहित अधिकांश विकसित देशों में नए-नए अविष्कारो एवं प्रौद्योगिकी को विकसित देश में करने का अधिकांश श्रेय उनके अपने विशेषज्ञों की नही बल्कि गरीब देशों से आनेवाले इन प्रतिभाओं को जाता है। अर्थात, विकसित राष्ट्रों का व्यावसायिक आधारभूत ढाँचा विदेशी प्रतिभाओं के बलबुते पर टिका हुआ है। जर्मनी से प्रकाशित होनेवाली एक पत्रिका के अनुसार 'माइक्रोसॉफ्ट'

कंपनी में ३४ प्रतिशत और अमेरिका के राष्ट्रीय अंतरिक्ष अनुसाधन केंद्र (नासा) में ३६ प्रतिशत भारतीय काम संभाले हुए है।

एक सर्वेक्षण के अनुसार अमेरिका में लगभग ३१ प्रतिशत उच्च स्तर के पदस्थ प्रतिभावान भारतीय है। कॉम्प्युटर क्रांति का सेहरा भले ही अमेरिका के सर पर बँधता है लेकिन इंटरनेट पर होनेवाली कंपनी 'सन माइक्रोसिस्टम' के सहसंस्थापक विनोद खोसला एक भारतीय है । पेंटियम चिप के अविष्कारक विनोद दाहम भी भारतीय ही है । अमेरिका में इस क्षेत्र के प्रख्यात सिलिकन व्हॅली में अधिकांश भारतीय प्रतिभाओं को देखकर अमेरिका के पूर्व राष्ट्रपति बिल क्लिंटन विस्मय में पड़ गए थे और उन्होंने आश्चर्य भी जाहीर किया था ।

प्रतिभा पलायन की समस्या को उदारीकरण ने हवा दी है । ६० से ९० के दशक में ज्यादा तर २०-२५ वर्षों की युवा प्रतिभाओं ने देश से पलायन किया था । फ्रेशर होने के कारण इन्हें दूसरे देश के वातावरण और कार्यशैली में ढ़लने में आसानी होती थी । दूसरा उस समय अधिकतर वैज्ञानिक, डॉक्टर, इंजिनियर आदि विदेश जाते थे ।

लेकिन ९० वे शतक में 'ग्लोबलाइजेशन' के कारण विश्व भर की कंपनियो की कार्यशैली और उत्पादन प्रक्रियाएँ लगभग एक जैसी हो गई । परिणाम स्वरूप अब प्रबन्धन के क्षेत्र की युवा प्रतिभाएँ भी देश से पलायन कर रही है । इस कारण आज देश में योग्य डॉक्टर, इंजिनिअर एवं वैज्ञानिकों के साथ कुशल प्रबंधको की भी कुशल प्रबंधको की भी कमी हो गयी है ।

राष्ट्र के विकास को गति देने के लिए प्रतिभाओं के पलायन को रोकना अति आवश्यक है । इसके लिए उपयुक्त परिस्थितियाँ एवं वातावरण बनना होगा । यह सरकार की इच्छाशक्ति पर निर्भर करता है । हर देशप्रेमी प्रतिभा का यह दायित्व बनाता है कि वह पलायन कर रही प्रतिभाओं की जगह डॉ. चंद्रशेखर वेकटसन, डॉ. शान्ति स्वरूप भटनागर, डॉ. होमी जहाँगीर भाभा, जगदीश चंद्र बसू, मेघनाथ साहा एवं एन. सेठ विक्रम साराभाई, अब्दुल कलाम, जयंत नारलीकर जैसी विभूतियों को भी देख ओर उनका अनुसरण करें । जिन्होंने इन्ही साधन एवं सुविधाओं के बीच उल्लेखनीय उपलब्धियों से राष्ट्र के गौरव को बढ़ाया है । यदि आदर्श राष्ट्र एवं संस्कृति की सेवा के रूप में जीवन का सार्थक नियोजन हो तो भौतिक प्रलोभन एवं असुविधाओं को अवरोध नही माना जा सकता।

यह एक चिंता का विषय हो सकता है कि १०० से अधिक देशों में आज २ करोड से अधिक भारतीय मूल के लोग रह रहे है । यह सच है कि भारतीय मूल के निवासियों को वहाँ के धन में रुचि नही । प्रवासियों ने जो धन अर्जित किया है उसके पीछे उनका विशाल अनुभव भी है । लेकिन इसी के साथ उनके अन्तरतल में कहीं एक टीस भी होती है कि अगर अपने देश में ही पर्याप्त सुविधाएँ एवम् अच्छा माहौल मिले तो कौन बाहर जाना चाहेगा।

सरकार को चाहिए कि अपने देश की प्रतिभाओं को देश में ही रखने के लिए नई नीतियाँ बनाए । हर क्षेत्र में राजनैतिक हस्तक्षेप एवम् एक दुसरे को नीचे धकेलनेवाले पनपते भ्रष्टाचार को खतम किया जाए । विद्यार्थी अपने देश की उन्नत्ती का मार्ग होते है । यह मार्ग ही खुद को मोड लेगा तो देश कहाँ जाएगा?

◆

# भाषा शिक्षण : स्वरूप

**अभिषेक महादेव माळी**

बी. ए.-३

**भाषा शिक्षण से तात्पर्य**

शिक्षण एक सोदेश्य, गतिशील, विकासात्मक एवं सचेतन प्रक्रिया है। निर्दिष्ट उद्देश्य प्राप्ति के लिए अध्यापक द्वारा सुनियोजित क्रिया को शिक्षण के रूप में स्वीकार किया जाता है। इसका उद्देश्य छात्र के व्यवहार में वांछित परिवर्तन लाना है। शिक्षण की परिणति अधिगम है तथा वह प्रक्रिया है, जिसमें प्रशिक्षण के फलस्वरूप वह अनुभवी बन जाता है। व्यक्ति के व्यवहार में ऐसा परिवर्तन होता है कि वह नवीन कुशलता को प्राप्त करने में नवीन आदतों के विकास में तथा सामाजिक समायोजन में समर्थ होता है। स्पष्ट है मात्र विभिन्न विषयों की जानकारी देना शिक्षा नहीं है, अपितु वह ऐसे ज्ञानात्मक संस्कार है, जिससे व्यक्ति के व्यक्तित्व का बहुआयामी विकास हो। इसीलिए शिक्षण प्रक्रिया में शिक्षण और अधिगम का परस्परसंबंध आवश्यक होता है।




भाषा सभी तरह के शिक्षण का माध्यम होता है। भाषा की कमजोरी शिक्षण के उद्देश्यपूर्ती में सबसे बडी बाधा बन जाती है । इसीलिए शिक्षण–प्रक्रिया में भाषा शिक्षण का महत्त्व अधिक है । भाषा शिक्षण औपचारिक रूप से सुनियोजित एवं सोद्देश्य प्रक्रिया है । जिसके द्वारा छात्रो में कुशलता का विकास किया जाता है सामान्यत: शिक्षण का अर्थज्ञान प्रदान करना, जानकारी देना है, कुशलता का विकास करना है । परंतु भाषा–शिक्षण के संदर्भ में भाषा के सैद्धांतिक ज्ञान का कोई महत्त्व नही है। भाषा की संकल्पना कौशल्य प्रधान विषय के रूप में जाती है । अत: भाषा शिक्षण से तात्पर्य शिक्षण की उस विशिष्ट व्यवस्था से है । जिसके द्वारा भाषाई कुशलता का विकास संभव है । भाषाई कुशलता का संबंध भाषा के चार कौशलों से है - सुनना, बोलना, पढ़ना और लिखना । इन कुशलताओं के संस्कार भाषा शिक्षण कहलाते है । इसके मुख्यत: चार घटक है - छात्र, अध्यापक, पाठ्यसामग्री और शिक्षण - विधी, लेकिन सम्पूर्ण शिक्षण - प्रक्रिया के केंद्र में छात्र होता ।

**भाषा शिक्षण के उद्देश्य**

भाषा शिक्षण का क्षेत्र अनुप्रयोगात्मक होता है । अनुप्रयोगात्मक होने के कारण वह अनिवार्यत: उद्देश्य केंद्रित होता है । भाषा किसी न किसी विशेष उद्देश्य या प्रयोजन के संदर्भ में सिखाई जाती है । भाषा का व्यक्ति, समाज और राष्ट्र के जीवन में एक महत्त्वपूर्ण स्थान है । एक और वह व्यक्तित्व के विकास और अभिव्यक्ति का माध्यम है, तो दुसरी ओर उसके समाजीकरण का साधन; एक ओर वह समाज में संप्रेषण व्यवस्था का उपकरण बनती है तो दूसरी ओर व्यक्तियो को सामाजिक वर्गो में बाँटने और

उनसे बिलगाव करने का : हेतु एक ओर वह राष्ट्रीय भावना का संवाहक बनती है तो दूसरी ओर एक ही राष्ट्र के विभिन्न भाषाई समुदायी में विषयभाव उत्पन्न करनेवाली एक चेतना । अत: कहा जा सकता है कि भाषा शिक्षणसंबंधी निर्णय का राष्ट्र समाज और व्यक्ति के जीवन पर व्यापक प्रभाव पडता है । भाषा को प्राय: संकुचित लक्ष्य को बांधकर देखा जाता है । केवल भाषा-ज्ञान तथा शिक्षण भाषाई कौशल प्राप्ति करने की प्रक्रिया है । इसे प्राप्त करने के बाद राष्ट्र, समाज और व्यक्तिजीवन में जो गुणात्मक विकास देखा जाता है, वे ही मुलत: भाषा - शिक्षण के बृहत उद्देश्य है । उनमें से कुछ यहाँ द्रष्टव्य है - १) मन की सृजनात्मकता : भाषा मनुष्य के विचार और दृष्टिकोन को बहुत दूर तक प्रभावित करती है, सामान्यत: मनुष्य भाषा के नियंत्रण में रहता है । भाषा उपलब्धि की उच्चतम स्थिति भाषा से नियंत्रित होने की स्थिती से निकलकर भाषा को नियंत्रित करने की होती है । जिससे अनुभूतियों को सृजनात्मक स्तर पर व्यक्त किया जा सके ।

२) दृष्टि की युक्तता : भाषा, जीवन और जगत को देखने की एक दृष्टि भी है । हम इस संसार को उसी प्रकार देखते है और अपने अनुभवों को उसी रूप में ढालते है, जिस तरह भाषा हमें देखने और ढालने की अनुमति देती है । अन्य भाषा शिक्षण हमें संसार को इस बंधी-बंधाई दृष्टि से भिन्न एक दूसरी दृष्टी से जीवन और जगत को देखने की शक्ति देता है । अत: हम एक ही वस्तु को एक से अधिक दृष्टि से देखने में समर्थ होते है ।

३) बुद्धि की समृद्धता : भाषा ज्ञानार्जन का एक प्रमुख एवं महत्त्वपूर्ण साधन है । नित नये शब्दों द्वारा हम एक ओर बाह्य जीवन की वस्तुओं की जानकारी प्राप्त करते है और दुसरी ओर विश्लेषणात्मक और संश्लेषणात्मक प्रक्रिया के सहारे अपने विचार को स्वयं समझते है । इस प्रकार हम ज्ञान और बुद्धि के धारातल पर भाषा के सहारे समृद्ध से समृद्धतर होते जाते है ।

४) व्यक्तित्व की सामाजिकता : भाषा मात्र संप्रेषण का साधन ही नही । यह व्यक्ति की सामाजिक बनाने का समर्थ माध्यम भी है । इसके सहारे व्यक्ति, समाज से जुडता है और शिक्षण एक अविरत प्रक्रिया है, जिसमे भाषा से समाज, संस्कृति और समाजसंस्कृति से सामाजिक व्यक्तित्व की प्राप्ति होती चलती है। वह वस्तुत सामाजिक व्यक्तित्व के निर्माण की स्थिति है । भाषा शिक्षण के उद्देश्य उत्क निर्देशित व्यापक संदर्भ में देखे जाने चाहिए । इन व्यापक संदर्भो के कारण भाषा शिक्षण भाषा - अध्ययन-अध्यपन के सिमित दायरे से निकलकर व्यक्ति समाज और देश के नए संदर्भ में नए उत्तरदायित्वो से युक्त एक निरन्तर प्रक्रिया के रूप में अपने प्रयोजन सिद्धी में सफल होगा ।

**भाषाशिक्षण प्रक्रिया**

भाषाशिक्षण एक निरंतर चलनेवाली सोउद्देशय प्रक्रिया है । विधिवत स्कूल-कॉलेजों की औपचारिक शिक्षा के बाद भी भाषा-अधिगम चलता ही रहता है । भाषाशिक्षण की प्रक्रिया में मातृभाषा तथा अन्य भाषा का शिक्षण एवं अधिगम प्रक्रिया आ जाती है । इसीलिए भाषाशिक्षण प्रक्रिया को समझने के पूर्व मातृभाषा और अन्य भाषा की अवधारणाओं को समझना आवश्यक है । क्योंकि मातृभाषा तथा अन्य भाषा के शिक्षण प्रक्रिया में अंतर आ जाता है।

**भाषाशिक्षण और भाषाएँ**

शिक्षण के संदर्भ में सामान्यत: मातृभाषा, द्वितीय अथवा अन्य भाषा विदेशी भाषा का प्रयोग होता है । उनका परिचय आरेख के सहारे इस तरह से दिया जाता है।




१) मातृभाषा : मातृभाषा का शाब्दिक अर्थ है - माँ

की भाषा से जिसे बालक माँ के सान्निध्य में रहकर सहज रूप से सुनना और बोलना सीखता है । मातृभाषा को बालक माता-पिता-भाई-बहन तथा अन्य पारिवारिक जनो के बीच रहकर सहज और स्वाभाविक रूप से सीखता है। क्योंकि बालक सामान्यत: माँ के संपर्क में अधिक रहता है । इसीलिए बचपन से सीखे गई बोली मातृभाषा कहा जाता है औपचारिक शिक्षा के क्रम में वह मातृभाषा के मानक रूप सीख लेता है । यह मानक रूप किसी क्षेत्रीय भाषा का मानक रूप होता है । इसका व्यवहार क्षेत्र अपेक्षाकृत विस्तृत होता है। इसे ही प्रथम भाषा कहा जाता है । भाषाई कौशलो का विकास सर्वप्रथम मातृभाषा में ही संभव है । मुख्य कौशलों पर अधिकार का तो यह एक मात्र साधन है । मातृभाषा व्यक्ति को व्यापक सामाजिक संदर्भो से जोडती है और सामाजिक अस्मिता का निर्धारण भी करती है । इस दृष्टी से मातृभाषा व्यक्ति और समाज की आत्मीय भाषा होती है; उसकी सामाजिक परंपरा और सांस्कृतिक विशेषताओं से वह अभिन्न रूप में जुडी हुई होती है । अत: भाषा शिक्षण तथा अधिगम में एक प्रकार की सहजता और आत्मीयता होती है । मातृभाषा जीवन से अभिन्न संबंध होने के कारण बालक संकल्पनाए द्वारा ही विकसित होती है। अत: शिक्षण का समस्त ज्ञान इसके तथा ज्ञान-विज्ञान के विविध क्षेत्रो में वंछित जानकारी प्राप्त करने का एक मात्र प्रारंभिक साधन मातृभाषा ही है। मातृभाषा बालक के विकास का मूल आधार है । उसके बौद्धिक विकास, ज्ञानार्जन, उसके जन्मजात गुणों के प्रस्फुटन, उसकी रचनात्मक शक्ति एवं अभिव्यक्ती कुशलता के विकास का माध्यम मातृभाषा ही है । उसके व्यक्तित्व मातृभाषा के द्वारा ही सुगठित होता है । इसलिए शिक्षा का माध्यम मातृभाषा होना चाहिए, इस पर शिक्षाविद् जोर देते रहे है । उसी तरह मातृभाषा - शिक्षण पर भी बल देते रहे है। इस संबंध में बैलार्ड का कथन है । यदि विचार और आंतरिक भाषा एक दुसरे से इतने सन्निकट ग्रंथीत है । वे साथ ही बढते है और घटते है तो एक के बिना दुसरे का उपार्जन नही कर सकते और मातृभाषा का शिक्षण उस भाषा का जिसमें बालक सोचता और स्वप्न देखता है। शिक्षा का प्रमुख अंग और मानव संस्कृति का सर्वोत्तम साधन हो जाता है । स्पष्ट है की मातृभाषा की शिक्षा अत्यंत महत्त्वपूर्ण एवं अनिवार्य प्रक्रिया है ।

अन्य भाषा : शिक्षा के संदर्भ में अन्य भाषा के दो वर्ग होते है - एक देश से संबंध भाषाओं का वर्ग देशीय तथा विदेशी भाषाओं का वर्ग विदेशी । इन दोनों वर्गों को फिर से दो उपवर्गो में बाँटा जाता है। अपने मातृभाषा से अन्य अन्य देशीय भाषाएँ हमारी द्वितीय भाषा कही जाती है । इन में से कुछ समस्त्रोतीय तथा कुछ विषम स्त्रोतीय भाषाएँ है। जैसे मराठी या हिंदी भाषी व्यक्ति के लिए आर्य-परिवार की समस्त भाषाएँ समस्त्रोतीय है । क्योंकि इन सभी भाषाओं का जन्म संस्कृत से हुआ है । कन्नड, तेलगु, मल्यालम आदि भाषाएँ उसके लिए विषम स्त्रोतीय देशीय वर्ग की भाषाएँ होगी । समस्त्रोतीय भाषाओं में भाषाई घट की दृष्टी से समानता हो सकती है । भिन्न स्त्रोतीय भाषाओं में स्त्रोत की भिन्नता के कारण भाषाई घटकी में भिन्नता की अधिक संभावना होती है । विदेशी भाषा दूसरे देश की भाषा है । इसमें भी समस्त्रोतीय तथा भिन्न स्त्रोतीय भाषाएँ होती है । भाषा-शिक्षण में मातृभाषा, समस्त्रोतीय द्वितीय भाषा (देशीय), विषम स्त्रोतीय भाषा (देशीय) तथा विदेशी भाषा शिक्षण की प्रक्रिया तथा अधिगत - प्रक्रिया में अंतर आ जाता है ।

◆

# उसे इस पर गर्व होगा

**महाजन मयुरी मनोहर**
बी. ए.-२

मरे हुए व्यक्ति को कंधा देने का कार्य कितना ही पवित्र और परोपकारी क्यों न हो, उसका कोई उपयोग नहीं है। लेकिन हमारी मानवता इस बात से निर्धारित होती है कि हम जीवितों को कितने हाथ देते हैं, न कि कितने मृतकों को हम कंधा देते है। मनुष्य के मरने का समाचार सुनकर जो लोग दौड़ते हैं, वे जीवित रहते हुए, अधोगति में क्यों नहीं भागते।

वास्तव में, जो व्यक्ति किसी के पीछे भागता है, उसका दौड़ना व्यर्थ है। क्योंकि तुम न भी जाओगे तो दुसरे उसे जलाए बिना न रहेंगे। लेकिन कई लोग ऐसे भी हैं जो व्यर्थ ही भाग रहे हैं।

दरअसल आज के झुठे दिखावों की दौड़ में तुम बड़े हो या मैं बड़ा, क्षणभंगुर दौलत दिखाने के लिए इंसान इंसान और इंसान के बीच के रिश्ते को भूलता जा रहा है.

इसलिए मैं बात कर रहा हूँ, एक जीवित व्यक्ति के लिए कम से कम एक ऐसे व्यक्ति को जीवन में वास्तविक इमानदार हाथ दें जो जीवित है और संकट में हैं... जो हुआ उसे भूल जाओ, मुझे छोड़ दो और एक आदमी बनो... मरते दम तक इस पर गर्व करोगे।

''धुँधले पड़ गए इन्सानियत के सारे
रिश्ते, इंसान ना करे हम पर
गुमान...! जीते जी तुझे गुरूर नहीं
आया, कोई नहीं कहेगा कि तेरा बदन गाल
से ढँक जाएगा....! इन्सानियत की गांठ बंध
लो इन्सानियत की नस्ल इस पर गर्व करेगी....!''

◆

# प्रवासी भारतीयोंवाले देश में हिंदी

**खदीजा सादिक मुल्लाणी**
बी. ए.-२

**मारिशस :** मारिशस में भारतीयों का आगमन यद्यपि फ्रांससियों के काल में प्रारंभ हो गया था। लेकिन सन १८१० में भारतीय सिपाहियो ने अंग्रेजो को मदद देकर इसका संबंध ब्रिटिश साम्राज्य से जोड दिया था। तब तो हजारों की संख्या में भारत से उत्तर प्रदेश और बिहार से गिरिमिटिए मजदूर की हैसियत से मारिशस आना शुरू हो गए। ये लोग अपढ़-अशिक्षित थे लेकिन इनमें अपनी भाषा संस्कृति के प्रति गहरी आस्था थी। वे अपने साथ तुलसीकृत रामायण लेते गए बाद में कथाओं के सहारे वहाँ धर्म तथा हिंदी का प्रचार होता रहा।

सन १९१० में मारिशस में आर्य-समाज की स्थापना हुई, आर्य-समाज की विभिन्न पाठशालाओं में हिंदी अनिवार्य विषय के रूप में पढाई जाने लगी। मारिशस में भारतीयों के आगमन की शताब्दी के अवसर पर सन १९३५ में वहाँ हिंदी प्रचारिणी सभा की स्थापना हुई। इस सभा ने हिंदी प्रचार-प्रसार मे महत्त्वपूर्ण कार्य किया है। सन १९४९ में सभी सरकारी पाठशालाओं में हिंदी की पढ़ाई होने लगी। मारिशस के स्वतंत्रता संग्राम में हिंदी ने महत्त्वपूर्ण भूमिका निभायी है। यहाँ हिंदी शिक्षा को देशभक्ति का साधन बनाया गया। सन १९६० में स्वतंत्रता प्राप्ति के बाद सरकार की ओर से हिंदी को वांछित प्रोत्साहन मिला है।

मारिशस में हिंदी पत्रकारिता का इतिहास सन १९०१ में महात्मा गांधी के आगमन के बाद तथा उनके आग्रह पर मणिलाल डॉक्टर के मारिशस आने पर १९०७ से प्रारंभ होता है। उन्होंने हिंदी तथा अंग्रेजी में 'हिंदुस्तानी नामक पत्र प्रकाशित करना प्रारंभ कर दिया। इस पत्र के द्वारा उन्होंने भारतवासियों को अपने धर्म, संस्कृति तथा अधिकारों के प्रति जाग्रत किया। बाद में 'आर्य लोग', 'ओरियंटल गजट', 'मारिशस पत्र, 'इंडियन टाइम्स', 'जाग्रति' आदि कई पत्र निकले लेकिन उपयुक्त व्यवस्था के अभाव में कालकवलित हो गए। मारिशस के स्वाधीनता आंदोलन के जोर पकड़ने पर कई उत्साही व्यक्तियों द्वारा 'समाजवाद', 'मजदूर, 'आर्योदय, 'काँग्रेस, 'नवजीवन' 'जमाना', 'जनता' निकाले गए।

स्वतंत्रता के बाद 'जनता' नये आकार प्रकार से प्रकाशित हो रहा है। 'आभा, 'दर्पण', 'अनुराग', 'प्रकाश' 'बालसखा' का प्रकाशन उल्लेखनीय है। सभी विद्यालयों में हिंदी का अध्यापन होने लगा है। रेडियो तथा दूरदर्शन भी हिंदी प्रचार में महत्त्वपूर्ण भूमिका निभा रहे है।

मारिशस की हिंदी सेवी संस्थाएँ- आर्यसभा, हिंदू महासभा, हिंदी प्रचारिणी सभा, हिंदी परिषद, हिंदी लेखक संघ, हिंदी के शिक्षण तथा प्रचार-प्रसार के क्षेत्र में, सक्रिय है। सन १९७६ में द्वितीय विश्व हिंदी सम्मेलन के आयोजन का गौरव भी मारिशस को प्राप्त हुआ है। हिंदी के अंतर्राष्ट्रीय स्वरूप को विकसित करने में मारिशस की भूमिका सदा स्मरणीय होगी।

**फिजी :** फिजी में सबसे पहले हिंदी का प्रवेश ९ मई १८७९ को हुआ जब ४८१ भारतीयों से भरा पानी का जहाज 'लेवनीदास' फिजी के लेबुका बंदरगाह के किनारे लगा। १८७९ से १९१६ के बीच, शर्तबंदी कुली प्रचार (गिरमिट प्रथा) के अंतर्गत गन्ने के खेतों में काम करने के

लिए भारत के मजदूरों की भरती की जाती रही। इस प्रकार, फिजी में लगभग ६३,००० भारतीय लाए गए। फिजी में आए भारतीयों में हिंदी भाषियों की संख्या सर्वाधिक थी, जिसके फलस्वरूप सामान्य व्यवहार के रूप में हिंदी का स्वतः विकास हो गया।

गिरमिट काल के शोषण तथा अत्याचारों के बावजूद भारतीयोंने अपनी भाषा तथा संस्कृति का दामन न छोडा बल्कि इसे प्रयोग द्वारा पल्लवित पुष्पित करते रहे। सांस्कृतिक कार्यक्रमों, रामायण तथा भजन मंडलियों, नौटंकियों, रामलीलाओं, कृष्णलीलाओं के माध्यम से हिंदी गैर हिंदी भाषी फिजी वासियों के दिलों मे भी समा गई।

सन १९१६ में हिंदी की पढ़ाई के लिए पहली भारतीय पाठशाला खुली । तब से सनातन धर्म आर्यसभा, आर्य समाज, गुरुद्वारा कमेटी, तमिल तथा आंध्र, संगम ने हिंदी की पढ़ाई का नियमित तथा बहुविधा विकास किया। इन्ही स्वैच्छिक हिंदी संस्थाओं की सेवा साधना के फलस्वरूप आज हिंदी फिजी में प्रमुख द्वितीय भाषा के रूप में विकसित हो चुकी है।

फिजी में 'फिजी समाचार', 'शांतिदूत', 'जाग्रति', 'जय फिजी' और 'फिजी संदेश' हिंदी पत्रिकाओं का प्रकाशन हो रहा है। सिमित साधनों के बावजूद इन पत्रिकाओं का स्तर काफी अच्छा है। इन पत्रिकाओं के माध्यम से वहाँ स्वतंत्र हिंदी लेखन का भी विकास हुआ है। फिजी रेडियों का भी हिंदी-प्रचार संबंधी योगदान भुलाया नही जा सकता। सप्ताह में लगभग ७५ घंटे हिंदी कार्यक्रम प्रसारित होता है।

इधर फिजी हिंदी महापरिषद के गठन से हिंदी प्रचार-प्रसार की योजनाएँ क्रियान्वित की जा रही है। हिंदी लेखकों को बढ़ावा देने के लिए फिजी पत्रकार संघ की स्थापना हुई। हिंदी रंगमंच को प्रोत्साहन देने के लिए 'रंगमंच' नामक संस्था इस क्षेत्र में महत्त्वपूर्ण कार्य कर रही है। मनोरंजन के मुख्य साधन के रूप में हिंदी फिजी फिल्मो का विशेष स्थान है।

स्वतंत्रता के बाद फिजी संविधान में हिंदी को भी मान्यता प्रदान की गई है। संविधान की धारा ५६ के अनुसार हालाकि फिजी की राजभाषा अंग्रेजी है, हिंदी तथा काइबीती का प्रयोग भी स्वीकृत है। आम जनता के लिए प्रसारित होनेवाली सूचनाएँ प्रायः तीन भाषाओं (अंग्रेजी, हिंदी, काइबीती) में प्रसारित की जाती है।

फिजी में हिंदी के प्रचार-प्रसार में भारतीय, उच्चायोग का योगदान भी उल्लेखनीय रहा है। फिजी में भारतीय सांस्कृतिक केंद्र की स्थापना से हिंदी प्रचार कार्य को काफी बल मिला है। हिंदी के लेखन-पठन को बढ़ावा देने के उद्देश्य से भारतीय उच्चायोग के द्वारा भारत सरकार की छात्रवृत्ति पर प्रतिवर्ष कई छात्र हिंदी में उच्च अध्ययन वे लिए भारत भेजे जाते है। केन्द्रीय हिंदी निदेशालय के पत्राचार पाठ्यक्रम के द्वारा भी कई फिसी वासी हिंदी पढ़ रहे हैं।

**सुरीनाम :** सुरीनाम की कुल आबादी का ५०% से अधिक भाग भारतीय है। इनमें भी ९५% हिंदी क्षेत्रों से भारतीय मजदूरों के रूप में लाए गये थे। प्रवासी भारतीय अशिक्षित थे। इन्होंने कई प्रकार की यातनाएँ सही लेकिन अपना धर्म, भाषा, संस्कृति की धरोहर को नही लुटने दिया। हनुमान चालीसा और रामचरितमानस तो उन्हें कंठस्थ हो गए थे, इसे एक दूसरे को सुनाते-सुनाते हिंदी उनकी भावनाओं में मिल गई और जो आज तक भी सुरक्षित है। यहाँ एक प्रकार की हिंदी-सरनामी या सुरीनामी का विकास हो गया।

सन १८९० मे सुरीनाम के गर्वनर लोहमन यह भलीभाँति समझ गए कि प्रवासी भारतीय अपने बच्चों को 'डच' भाषा के स्कूलो में नही भेजेंगे। तभी उनकी सूझबूझ से कुली स्कूलो की स्थापना हुई जहाँ भारतीयों के बच्चे हिंदी-उर्दू पढने लगे। लेकिन यह व्यवस्था सफल न हो पाई। सन १९०७ में भाषा के साथ-साथ हिंदी की पढाई की जाने लगी लेकिन बाद में सरकारी नीति में हुए परिवर्तन से हिंदी स्कूलों से समाप्त कर दी गई।

भारतीय प्रवासियों ने सन १९१० में ‘सुरीनाम प्रवासी संस्था’ की स्थापना की। फिर एक के बाद एक संस्थाएँ बनने लगी। सन १९१२ में ‘आर्य समाज’ की स्थापना हुई। सन १९४४ मे ‘सनातन धर्म मासिक पत्रिका’ के प्रकाशन से हिंदी अध्यापन को बल मिला।

आज सुरीनाम में प्रयुक्त संपर्क भाषा में हिंदी का प्रयोग होता है। हिंदुस्तानी अब इसे सरनामी कहने लगे है। भारत सरकार के भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद के सक्रिय योगदान से यहाँ हिंदी प्रचार तथा शिक्षण को नया बल मिला। आज लगभग १५० केंद्रों मे राष्ट्रभाषा प्रचार समिति, वर्धा की हिंदी परीक्षाएँ चलायी जा रही है।

सुरीनाम से काफी संख्या में भारतीय हिंदी में विश्वविद्यालयीन शिक्षा के लिए हालैंड जाते है, क्योंकि विश्वविद्यालय स्तर पर वहाँ हिंदी, अध्ययन की कोई व्यवस्था नही है। वर्तमान पीढ़ी में हिंदी के प्रति गहरा लगाव है। यहाँ जाने-माने हिंदी सेवी भारतीय राजदूत श्री बच्चू प्रसाद सिंह के कुछ कुशल मार्गदर्शन में हिंदी प्रचार का काम सुचारू रूप से चल रहा है। सूरीनाम से ‘शांतिदूत’, ‘प्रेम संदेश’, ‘प्रकाश’ आदि लोकप्रिय हिंदी पत्रिकाओं का प्रकाशन भी किया जा रहा है।

**त्रिनिदाद :** सन् १८४५ में अनुबंधित श्रमिकों के रूप में भारतीयो का पहला दल त्रिनिदाद पहुँचा। कालांतर में श्रमिकों के रूप में या व्यापारीक संभाषणाओं से आकर्षित होकर यहाँ भारतीय आते रहे और उनमें अधिकांश यही बसते चले गए। यहाँ भारतीय मूल लोगो की संख्या बढ़ती जा रही है। और साथ ही हिंदी बोलनेवालो की भी। यहाँ की आबादी का लगभग एक तिहाई भाग हिंदी बोलने-समझनेवाले भारतीयो है।

यहाँ के प्रारंभिक प्रवासी भारतीयों की अपनी भाषा तथा संस्कृति को सुरक्षित रखने, और बढ़ातें रहने की कहानी से मिलती जुलती है। यहाँ हिंदी फिल्मे बहुत लोकप्रिय है। त्रिनिदाद दूरदर्शन, पर लोकप्रिय कार्यक्रम ‘मस्ताना बहार’ में भारतीय सिने गीतों की गायन प्रतियोगिताएँ आयोजित की जाती है। हिंदी गायकों की एक लंबी श्रृंखला है। त्रिनिदाद के प्रमुख सांस्कृतिक संगठन ‘सनातन धर्म महासभा’, ‘आर्य प्रतिनिधी सभा’, ‘विश्व हिंदू परिषद’, ‘हिंदू जवान संघ’ तथा ‘कबीर पंथ असोसिएशन’ हिंदी प्रचार की दिशा में सक्रिय है। इधर विश्वविद्यालयों में एक विषय के रूप में हिंदी को स्वीकृत किया गया है।

भारतीय सांस्कृतिक परिषद के तत्त्वावधान में यहाँ, ‘भारतीय सांस्कृतिक केंद्र’ स्थापित किया गया है। इस केंद्र में भारत से हिंदी अध्यापकों की प्रतिनियुक्ति की जाती है। अभी तक त्रिनिदाद के विश्वविद्यालय में हिंदी को पाठ्य विषय के रूप में स्थान नही मिला है। केंद्रीय हिंदी निदेशालय के पत्राचार पाठ्यक्रम में अंतर्गत बहुत से त्रिनिदादवासी हिंदी सिख रहे है।

